# प्रकरण दुसरे

# संशोधन साहित्याचा आढावा

**प्रस्तावना :**

कोणत्याही विषयात नवीन संशोधन करत असताना त्या विषयाच्या संबंधित साहित्याचा आढावा घेणे गरजेचे आहे. कारण त्या शिवाय संशोधनास योग्य दिशा मिळू शकत नाही. ''परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक-सामाजिक स्थितीचे अध्ययन २००१-२००२ ते २०१४-१५'' हा विषय अध्ययना करिता निवडल्यानंतर या विषयाच्या अनुषंगाने जे संशोधन साहित्य उपलब्ध आहे. अशा साहित्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे. संशोधन साहित्याचा आढावा घेण्याचे कारण की, विषयाच्या संबंधित आतापर्यंत कोणकोणते साहित्य उपलब्ध आहेत ? कोणी या विषयावर संशोधन केले आहे काय? आणि जर कोणी या विषयावर संशोधन केले असतील तर त्यात यामध्ये त्यांने कोणते निष्कर्ष काढले व आपणास त्यापुढे जाऊन कशा-कशाचा शोध घेता येईल. यांची माहिती संशोधन साहित्याच्या आढाव्याद्वारे मिळू शकते.

त्याचप्रमाणे संशोधन करतांना संबंधित विषयाचे ज्ञान अर्जित करण्यासाठी विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास केला जातो. या सर्व गोष्टीचा विचार करुन सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी संशोधन साहित्याचा आढावा घ्यावा लागतो. म्हणून या ठिकाणी संशोधकाने वर्तमानपत्रे, मासिकामधून प्रकाशित होणारे संशोधनपर लेख याविषयी राष्ट्रीय, राज्यपातळीवर झालेले संशोधन, प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ अहवाल इत्यादी सर्व महत्वाच्या बाबींचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

**१) रसेल, आर.व्ही. आणि रायबहादूर, हिरालाल (१९१६) :**

आर. व्ही. रसेल आणि रायबहादूर हिरालाल यांच्या मते, आंध जमात ही प्रामुख्याने आंध्र आणि या भागातील आर्यानंतरची जमात आहे. आंध या जमातीची उत्पत्ती आंधापासून झाली असली तरीही आंध नाव यांच्या स्थलांतरानंतर नवीन प्रदेशात त्यांना ओळखण्यासाठी दिलेले असावेत. स्थालातंर होण्यापूर्वी आंध जमातीला परदेशी, बिरारी व औठीया इत्यादी नावाने ओळखले जात असे.

रसेल आणि हिरालाल यांच्या मते, यवतमाळ, बुलढाणा आणि अकोला या जिल्ह्यातील शेती व्यवसाय करणारी ही जमात आहे. या जमातीच्या संदर्भात काही निष्कर्ष मांडले आहे.

१) आंध जमातीत एकाच कुळात लग्न केले जात नाही.

२) या जमातीमध्ये बहुपत्नी करण्यास मान्यता आहे.

३) घटस्फोट व विधवा झालेल्या स्त्रियांना पुनविवाह करण्यास मान्यता आहे. परंतु त्या महिलांना दिरा बरोबर लग्न करता येत नाही.

**२) ओ.एस.बी (१९२८) :**

ओ.एस.बी. यांनी १९२८ साली आदिवासी जमातींच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने जंगल भागातील व डोंगराळ भागातील अनेक जमातींचा समावेश आदिवासी जमातींच्या यादीत करावा अशी शिफारशी केली होती. या समितीने सूचविलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे.

१) ठराविक जमाती या अती मागासलेल्या आहे.

२) या जमातीची आर्थिक-सामाजिक परिस्थिती कमकुवत असल्याचे दिसून येते.

३) सर्व सोयीसुविधा आणि शिक्षणापासून ह्या जमाती वंचित आहे. या सर्व गुणाच्या आधारावर त्यांचा अनुसूचित जमातीत समावेश करावा.

**३) सावे, के.जी. (१९३५) :**

सावे के.जी. यांनी ''ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमातीतील वारलींचा अभ्यास'' या शोधप्रबंधात 'वारली' जमातींच्या कर्जबाजारीपणा परिस्थितीचा अभ्यास केला आहे. संशोधनासाठी प्राथमिक साधन सामुग्रीचा वापर केला असून एकूण ८५ कुटुंबांची निवड करुन सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ७१ कुटुंबे ही कर्जबाजारीपणात आडकलेली निदर्शनास आले आणि उरलेले १४ कुटुंबांनी कर्ज घेतलेले नव्हते. ६ कुटुंब हे दहा वर्षापेक्षा जास्त काळ कर्जबाजारीपणात जीवन जगत होते. ५ वर्षाच्या आतील काळात कर्ज घेणाऱ्या कुटुंबांची संख्या बऱ्याच प्रमाणात होती. नवीन कर्ज घेण्याचे कारण की, जुने असलेले कर्ज फेडण्यासाठी घेतले होते. संशोधनात असे आढळून आले की, वारली जमातीतील सर्वच लोक विवाह करण्यासाठी कर्ज घेतात. एकंदरीत विचार केल्यास वारली लोकांचा जन्म आणि मृत्यू हा कर्जामध्येच होतो.

**४) सिमिग्टन, डी. (१९३८) :**

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सरकारने सिमिग्टन डी. या अधिकाऱ्यांची (१९३८) निवड केली. त्यांनी नाशिक, ठाणे आणि पश्चिम खानदेशातील आदिवासींच्या समस्या कोणत्या या संबंधीत पाहणी करण्यासाठी केली होती. त्यांनी केलेले संशोधन हे भिल्ल जमाती संबंधीत आहे. भिल्ल जमातीतील शेतीची पध्दत ही हलक्या प्रतीची आहे. या जमातीत कर्जबाजारीपणा मोठ्या प्रमाणात आहे. या जमातीतील प्रत्येक आदिवासी कर्जामध्ये अडकलेले आहे. कर्ज घेण्याची सुरुवात पिकांच्या बरोबर सुरु होते. सावकाराकडून घेतलेल्या कर्जातून बि-बियाणे खरेदी करण्यासाठी ४० रुपये खर्च करतात, कपडे खरेदीकरिता ५ रुपये खर्च करतात आणि भिल्ल जमातीत दारुचे व्यसन असल्याने दारुवर २ रुपये खर्च करतात. अशा प्रकारे तो सावकार मंडळीच्या शेतामध्ये एक दिवस जास्त काम करतो. घेतलेल्या कर्जाच्या मोबदल्यात सावकार

संपूर्ण शेतमाल काबीज करतो. गरज पडल्यास शेतमालाची किंमत सावकारच ठरवितो, आणि उरलेली रक्कम तो शेतकऱ्यांना देतो. अशा प्रकारे सिमिंग्टन या संशोधकाने काही शिफारशी मांडल्या आहे. आदिवासी समाजातील लोकांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच आदिवासींच्या असलेल्या समस्या नव्याने सोडविण्यासाठी विचार करावा, आदिवासींना सावकारांच्या तावडीतून सुटका करण्यात यावी.

**५) गुहा, बी.एस. (१९४४) :**

गुहा बी.एस. यांनी १९४४ मध्ये आदिवासींच्या बाबतीत संशोधन करुन काही निष्कर्ष मांडले. तसेच त्यांनी आदिवासींच्या शारीरिक रचनेची तीन विभागात विभागणी केली आहे.

१) भारतातील ईशान्य आणि उत्तर भागात (पूर्व पंजाब, पुर्व कश्मीर, आसाम, उत्तर प्रदेश, सिक्कीम) असणाऱ्या आदिवासींची शारीरिक रचना, मंगोलाईड वंशाच्या लोकांप्रमाणे आहे. हे लोक पिवळया रंगाचे आहे. त्यांच्या डोळयांची रचना लांबलचक, नाक चपट्या आणि बसलेल्या ११ स्वरुपाची, मध्यम उंचीचे, केस हे काळेभोर असून सरळ असतात. उठावदार हनुवटी व स्वप्नील डोळे ही त्याची वैशिष्ट्ये आहे. येथील जमाती ही जॉनसरी भारू, नागा, कुकी, खासी, लेवचा व भोटिया या जमाती आहे.

२) भारतातील मध्य विभागात येणारे राज्य (बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरात इत्यादी) राज्यात असणाऱ्या आदिवासी जमातीतील शारीरिक ठेवण वरुन त्यांना 'प्रोटो ऑट्रेलाईट' वंशाचे लोक म्हणून ओळखले जाते. या लोकांचे रंग काळे ठप्प असून डोळे लांब स्वरुपाचे, केस कुरळे दिसून येतात. यामधील लहान, मध्यम, उंचीचे असून ते मुंडा, भिल्ल, उरॉव, गोंड बैग हो भूइया, चेंचू, कोखा, कोंडा या जमातीचे आहेत.

३)	भारतातील दक्षिण भागात असणाऱ्या आदिवासी जमातीमध्ये निगोटो वंशाचे सर्व प्रकारचे शारीरिक गुणधर्म दिसून येतात. या लोकांना निगोटो या नावाने ओळखले जाते. यांचे रंग डांबरासारखे काळे ठप्प, चपट्या नाकाचे ओठ हे मोठे व जाड असते. डोळे लांब ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये, पूर्व अफ्रिकेतील निगो यांचे शारीरिक रचनेचे सूत्र हे मिळते जुळते आहे. कोटा, तोटा, कुरंभा, उरली, इरुला, कादर या आदिवासी भागातील जमातीचे लोक येथे दिसून येतात.

**६) नेहरू, जवाहरलाल (१९५५) :**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यातील 'जलदपूर' येथे भरलेल्या ''आदिवासी विकास परिषदेत'' आदिवासी विभाग क्षेत्रात येणाऱ्या आदिवासी जमातीतील लोकांच्या संबंधीत अभ्यासावरुन आदिवासींचा विकास करण्यासाठी कोणत्या गोष्टीचा उपयोग करावा. या संबंधीत त्यानं आपले विचार स्पष्ट केले आहे. या परिषदेत यांनी पाच तत्वे सांगितले आहे.

१. विकासाची कामे करण्यासाठी आणि व्यवस्थापनाकरिता आदिवासी जमातीतील लोकांना प्रशिक्षण देवून प्रशिक्षित करावे.

२. त्यांच्या जमिनीचे होणारे हस्तांतर आणि जंगल तोडीचे होणारे प्रमाण थांबविण्यात यावे.

३. आदिवासी विभाग क्षेत्रामध्ये अतिशय कठोर प्रशासन व्यवस्था राबविता कामा नये. तसेच त्यांना अति उत्साह निर्माण योजनांचा अवलंब करु नये.

४. या लोकांच्या अंगी असणाऱ्या चांगल्या गुणाच्या विकासासाठी प्रोत्साहन द्यावे.

५. या क्षेत्रात होणाऱ्या खर्चाचा तसेच त्यांच्या आकडेवारीवरुन कोणताही निष्कर्ष काढू नये.

**७) कुलकर्णी, एम.जी. (१९६४) :**

एम.जी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली 'Problem of tribal development : A case study Harsul Black Nashik district.' या विषयावर पुणे येथील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या संस्थेकडून नाशिक जिल्ह्यातील पेठ या तालुक्यातील 'हरसूल ब्लॉक' या आदिवासी विभागात येणाऱ्या गटाची पाहणी केली होती. या संस्थेला जे काही निष्कर्ष प्राप्त झाले. ते पुढील प्रमाणे आहेत.

१) या भागातील ४९ गावातील एकूण भौगोलिक क्षेत्रफळ शेती करण्यास योग्य नसून जंगलांनी व्यापलेल्या जमिनीचे प्रमाण ४७.४ टक्के एवढे आहे.

२) या विभागातील पेरणीसाठी योग्य जमिनीचे प्रमाण ४२.६ टक्के एवढे होते.

३) लागवडी खालील न आणलेल्या क्षेत्रापैकी कायम पडिक जमिनीच्या क्षेत्राचे प्रमाण ८.९ टक्के दिसून आले.

**८) सक्सेना, आर. (१९६४) :**

सक्सेना आर यांनी 'मध्य भारतातील आदिवासींची आर्थिक पाहणी' मध्ये बिहार, महाराष्ट्र ओरिसा, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश इत्यादी राज्याची पाहणी केली असता त्यांनी आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा संशोधनात्मक अभ्यास केला व काही निष्कर्ष मांडले.

१) पश्चिम बंगाल राज्यातील आदिवासी हा सरकारी नोकरी आणि व्यापार त्याचबरोबर वाहनातून प्रवास करताना आढळतो.

२) महाराष्ट्रातील आदिवासी जमात साधारणपणे ५० ते ५५ टक्के शेतमजूरी करतात.

३) बिहार राज्यातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीब आहे.

४) गुजरात मधील आदिवासींची अर्थिक परिस्थिती मध्यम स्वरूपाची आहे.

५) राजस्थानातील आदिवासी ४३ टक्के शेती व्यवसाय करतात.

६) ओरिसामधील आदिवासी ५० ते ६० टक्के दारिद्र्यात जीवन जगत आहे.

**९) दुबे, वी.के. (१९६७) :**

दुबे यांनी १९६७ मध्ये मध्यप्रदेशातील अनुसूचित जमातीतील लोकांच्या संदर्भात अभ्यास केला आहे. संशोधनात मध्यप्रदेशातील वेगवेगळया क्षेत्रामध्ये पसरलेल्या निरनिराळया जमातींचा प्रमुख विशेषतः मध्यप्रदेशातील स्थितीच्या संदर्भात विवेचन केले आहे. अध्ययनानुसार समाजामध्ये श्रेष्ठ स्तरावर आणि राजकीय प्रभाव असणाऱ्या जमातींच्या दोन गटात विभाजन केले आहे. पहिल्या गटात त्या जमाती (जसे राजगोंड) जे की हिंदू जाती व्यवस्थामध्ये श्रेष्ठ स्तरावर ठेवले आहे. आणि दुसऱ्या गटात येणाऱ्या भील्ल व नागा जसे जमाती आहे. जे की मध्यप्रदेशातील प्राचीन गटाचे प्रतिनिधीत्व करत असते.

**१०) सिरसकर आर.पी. (१९६९) :**

सिरसकर आर.पी. याने (१९६९) मध्ये 'महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या समस्या' या शोध निबंधात आदिवासी समाजात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास केला आहे.

१) आदिवासी समाज हा दुर्गम व घनदाट जंगलात आणि दऱ्याखोऱ्यात राहणारी एक जमात आहे.

२) आदिवासींना संभाषणासाठी बोलीभाषा हा एक प्रश्न निर्माण झाला आहे.

३) आदिवासी हे स्वभावाने भोळसर असून शांत आहे.

४) आदिवासीमध्ये कर्ज घेण्याचे प्रमाण जास्त आहे.

५) आदिवासी समाजात कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात आहे.

६) आदिवासी हे निरक्षर असल्यामुळे व्यसनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते.

७) आदिवासी हे पारंपरिक पध्दतीने शेती करतात.

८) आदिवासी समाजात अज्ञानपणा मोठ्या प्रमाणात असून अंधश्रध्दांवर सुध्दा जास्त विश्वास ठेवतात.

**११) मिश्र, विनोद (१९७३) :**

विनोद मिश्र यांनी १९७३ मध्ये आदिवासी कर्ज बाजारीपणावर आधारीत आपल्या संशोधनात सांगितले आहे की, शेती पासून मिळणारे उत्पन्न कमी आहे. ज्यांचे कारण अकृषी व्यवसायापासून मिळणारे मर्यादीत उत्पन्न, निरक्षर, अज्ञान आणि आदिवासी समाजात सावकाराच्या बाबतीत आदराची भावना असे प्रमुख कारण आहे. जे की कर्जदारांना मानसिक ताण दिले जाते.

**१२) वन्यजाती संपादकीय (१९७३) :**

वन्य जाती संपादकीय यांनी असे दाखवून दिले की, आदिवासी कर्जाच्या व्याजाने कंटाळले आहे. कारण सावकाराकडून घेतल्या जाणारा कर्ज ५० ते ६० टक्के व्याज या शोषणापासून मोकळा करण्यासाठी पूर्ण दरवाजे बंद आहे. त्याच बरोबर चांगला कर्ज घेण्याचे प्रयत्न पूर्ण यशस्वी झाले नाही.

**१३) पाणी, पी.पी. (१९७६) :**

पाणी पी.पी यांनी आदिवासी भागातील शेत जमिनीची उत्पादन क्षमता आणि त्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान किती उपयोगी आहे. या संदर्भात संशोधन केले. त्याने ५७ बिगर शेतकऱ्यांची सर्वेक्षणाच्याद्वारे मुलाखत घेतली.त्यांच्या मते, आदिवासी भागातील २५ टक्के शेतजमीन ही नवीन तंत्रज्ञानासाठी उपयोगी आहे. या भागातील ७५ टक्के शेतजमीन नैसर्गिक पावसावर अवलंबून असून ती कोरडवाहू स्वरुपाची आहे. या विभागात जलसिंचनाच्या सोयी-सुविधांचा अभाव आहे. आदिवासी

भागात जलसिंचनावर आधारलेल्या अधिक उत्पन्न देण्याऱ्या पीकांची लागवड कमी प्रमाणात करण्यात आली. अशा प्रकारे या भागात विशेष घटक योजनांची अंमलबजावणी केल्यास आदिवासी भागात शेतीचा विकास होण्यास मदत होईल.

**१४) भौतिक, पी.के (१९७६) :**

या संशोधकांनी आपल्या संशोधनात आदिवासी समाजाचा सामान्य वर्गाची तुलना करुन असे दाखविले की, सामाजिक, सांस्कृतिक रुपाने आणि सामान्य वर्गांचे शोषण आहे. अशा प्रकारे समाजाचा हा सर्वात कमकुवत वर्ग आहे. कायदा व्यवस्थाकडून आदिवासी लोकांना सावकार, व्यापारी, आणि उच्च वर्गातील लोकांकडून होणाऱ्या शोषणापासून वाचविण्यासाठी व्यवस्था केली आहे.

**१५) यादव, हनुमंत व मिश्रा (१९८०) :**

हनुमंत यादव व मिश्रा यांनी १९८० मध्ये आदिवासी विकास प्रकल्पाद्वारे उत्पन्न रोजगार, मालमत्ता या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे. त्याने ५० आदिवासी लाभार्थी कुटुंबांची निवड केली असून आदिवासी विकास प्रकल्प राबविल्यामुळे आदिवासी लोकांच्या उत्पन्नात, रोजगारात आणि मालमत्तेत वाढ झाली आहे. या आदिवासी कुटुंबाबरोबर बिगर आदिवासी कुटुंबाची सुद्धा या योजनेपासून अप्रत्यक्षपणे लाभ मिळाला आहे.

**१६) सांगळे आणि कुलकर्णी (१९८१) :**

सांगळे आणि कुलकर्णी यांनी ''किनवट तालुक्यातील आदिवासी उपाययोजनेचा अभ्यास'' केला. आदिवासी भागातील सरासरी कुटुंबातील व्यक्ति आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग थोड्या फार प्रमाणात करतात. आदिवासी समाजातील लोक मान्यता प्राप्त असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करतात. पटनाईक त्रिपाठी, भाटिया आणि ब्रह्मारठ सदागहो या संशोधकाच्या मते, आदिवासी हे नवीन तंत्रज्ञानाचा वापर, सुधारित बी-बियाणे, खते, पीक संरक्षण या बाबतीत वापर करत असल्याचे दिसून आले. त्यास

वैयक्तिक परिस्थितीजन्य आणि सामाजिक मानसशास्त्रीय व माहिती यासारखे घटक माहिती तंत्रज्ञानाच्या वापराचा अभाव कारणीभूत आहे. तसेच शेतीचे व्यापारीकरण, कुटुंबातील शिक्षणाचे कमी प्रमाण, सामाजिक अडथळा ह्या तंत्रज्ञान वापरासाठी कारण आहे.

**१७) घोडे, मंगल (१९८७) :**

मंगल घोडे यांनी 'एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत झालेल्या लाभाचे मूल्यमापन' या विषयावर संशोधन केले आणि काही निष्कर्ष मांडले.

१) अनुसूचित जमातीतील लोकांचा कल शेती व्यवसायाकडे आहे. ७८ टक्के लोक लाकुड शेती व्यवसाशी निगडित आहे.

२) या जमातीतील हे १९ टक्के लाभार्थी कुटुंब हे शेतमजूरी हा व्यवसाय करतात.

३) या जमातीतील ६५ टक्के लाभार्थी कुटुंब हे भूमिहीन असल्याने ते मोलमजूरी करतात.

**१८) लालफाक, झुआलांनी (१९८८) :**

लालफाक झुआलांनी यांनी 'महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेचे मूल्यमापन' याचा अभ्यास केला. 'त्यांना असे आढळून आले की, अतिमागास असलेल्या व स्वत;च्या जीवन मूल्यांची जपवणूक केलेल्या आदिवासींचा परिपूर्ण विकास करणे हे साधे काम नाही. महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या विकास कामासाठी अनेक योजना राबवून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील आदिवासींचे असलेले प्रश्न आदिवासी उपयोजना या साधनाचा वापर करून महाराष्ट्रात निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यात आल्या आहेत. या योजनेमध्ये काही अडचणी असल्या तरी या योजनेपासून आदिवासींना लाभ, फायदा मोठ्या प्रमाणात झालेला आहे. आदिवासी विकासाकडून बऱ्याच प्रमाणात कार्य झाले आहे, परंतु अजूनही जास्त प्रमाणात कार्य करायचे बाकी राहिलेले आहे.

**१९) चौधरी, उद्धव (१९९०) :**

चौधरी उद्धव यांनी 'आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास' केला. त्यांनी आपल्या संशोधनात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, व्यसनाचे प्रमाण, कर्जदाराचे प्रमाण इत्यादी बाबी विषयी आपले मत व्यक्त केले. त्यांच्या मते, त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असून त्यांचे उत्पन्न हे मर्यादित स्वरूपाचे आहे. त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू ते सभोवतालच्या वातावरणातून आणि निसर्गातून मिळविण्याचा प्रयत्न करतात आणि जवळच असलेल्या बाजारात विकून पाहिजे त्या वस्तू खरेदी करतात. असा त्यांचा आर्थिक व्यवहार चालत असतो. आदिवासी लोकांच्या जेवनात फळे, कंदमुळे, नाचण्याची भाकर, कधी-कधी जंगलात जाऊन पशु-पक्षाची शिकार करून त्यांचे मांस भाजून खाणे इत्यादी आहे. परंतु शासनाने आजच्या युगात शिकार करण्यास बंदी आणलेली आहे. त्यामुळे त्यांना शिकार करता येत नाही. वृक्षाची तोड होत असल्याने शासनाने यावरही बंदी आणली आहे. त्यामुळे जंगली वस्तू, सरपण बाजारात आणून विकता येत नाही. त्यामुळे आदिवासींच्या दारिद्र्यात वाढ झाली आहे.

**२०) आसवाले, एम.जी. (१९९१) :**

एम.जी. आसवाले यांनी 'आंबेगांव तालुक्यातील पश्चिम घाटावरील आदिवासींचे जीवन' या विषयावर अभ्यास केला असून या संशोधनातून काही निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडले.

१) या परिसरातील भाग डोंगर दऱ्याखोऱ्याचा असून जंगलानी व्यापलेला आहे.

२) आंबेगाव तालुक्यातील पश्चिम घाटातील परिसरात विशेषतः हिंदु महादेव, कोळी, कातकरी, व ठाकर या आदिवासी जमाती राहतात.

३) या तालुक्यातील परिसरामध्ये वाहतुकीच्या सोयी सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आरोग्य सेवा, शाळा, रस्ते, वीज, इत्यादी या सारख्या सोयी सुविधा थोड्या प्रमाणात काही ठिकाणी आढळून येत नाही.

४) पावसाळ्यात होणाऱ्या सततच्या पाऊसामुळे आदिवासी समाजावर उपासमारीची वेळ येते.

**२१) सिंग, के एस. (१९९२) :**

सिंग के एस. यांच्या मते आंध समाज हा मुख्यतः विदर्भातील यवतमाळ आणि मराठवाड्यातील नांदेड आणि परभणी या जिल्ह्यामध्ये दिसून येतो. त्याने या जमातीचा अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढले आहे.

१) आंध जमातीतील लोक मराठी भाषेच्या बरोबर इंडो आर्यन भाषा ही बोली भाषे वापरतात. ते लिखाणासाठी देवनागरी लिपीचा वापर करतात.

२) आंध समाजामध्ये मामाच्या मुलीसोबत, आत्याच्या मुली सोबत लग्न केले जाते. तसेच या जमातीत साटेलोटे पद्धतीने सुद्धा लग्न लावून दिले जाते.

३) या समाजातील स्त्रिया शेती व्यवसाय, मत्स्यव्यवसायात तसेच धार्मिक विधी, सामाजिक कार्यक्रमात भाग घेताना दिसून येतात.

४) या समाजातील स्त्रियांचे बाळंतपण हे दाई यांच्या मदतीने केले जाते. आणि बारा दिवसापर्यंत विटाळ समाजात पाळतात.

५) आंध जमातीत लहान बाळाची विधीमध्ये पाचवी करणे, बारावी करणे, जावळाचा कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम करतात.

**२२) मेहता, प्रकाशचंद्र (१९९३) :**

मेहता प्रकाशचंद्र यांनी आदिवासींची भौगोलिक स्थिती, संविधानिक व राज्यातील स्थितीच्या अध्ययणाबरोबर या समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात

जोडण्याचा हेतु, वेळोवेळी बनवलेली विकासात्मक धोरण, प्रशासकीय व्यवस्था आणि आदिवासी विकासाच्याा संबंधीत संस्थेच्या कार्याचा मुल्यांकन केले आहे. आपल्या देशामध्ये निवासी प्रमुख जमाती भिल्ल, मीणा, गरासिया, सहारिया आणि डामोरच्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती आणि जीवनाच्या विविध पैलूचा अभ्यास केला आहे.

**२३) मांडे, प्रभाकर (१९९४) :**

प्रभाकर मांडे यांनी महाराष्ट्रामधील अनुसूचित जमातीतील गोंड, आंध, कोलम इत्यादी जमातीत 'दंडार' हे पारंपरिक एक लोकनृत्यांचा अभ्यास केला आहे. या लोकनृत्यांत गावातील मोकळ्या जागेवर किंवा देवाच्या जवळ येऊन या जमातीतील लोक गोल आकार करून उभे राहतात. त्यांच्या हातात दीड फुट लांबीचे दोन टिपरू हातात असतात आणि ते एकमेकांवर वाजवित लोकनृत्य सादर केले जाते. त्यांना 'दंडार' या नावानी ओळखतात. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेकडील असलेले हिंगोली वसमत, कळमणुरी आणि किनवट इत्यादी ठिकाणी नृत्य सादर केले जाते आणि विदर्भातील दक्षिणेच्या दिशेने असणाऱ्या रिसोड, पुसद, वाशिम या तालुक्यात नृत्य केले जाते. गोंड आणि कोलाम यां जमातीतील लोकांप्रमाणे आंध या जमातीचे 'दंडार' या नृत्यप्रकार होते. आता त्यांच्या स्वरूपात बदल झाला आहे.

**२४) वर्मा, एम.एम (१९९५) :**

वर्मा यांनी मध्यप्रदेशातील झाबुआ आणि पश्चिम निमाड जिल्ह्यातील भिल्ल-भीलाईची सामाजिक आणि परिवाराच्या रचना व जन्मपासून ते मृत्युपर्यंत प्रचलीत वेगळी प्रथा, संस्कार, उत्सव विश्वास इत्यादीचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला आहे. भिल्ल जमातींची आर्थिक परिस्थिती आणि संस्कृतीवर प्रशासकीय धोरण आणि इतर सेवाभावी संस्थाचा प्रभावाचा उल्लेख करतात आणि भिल्लांची समस्या व त्यांचा व्यापक समाधान सांगितले आहे.

**२५) कुलकर्णी, अ.द. (१९९५) :**

कुलकर्णी यांनी आदिवासी संशोधन पत्रिका मध्ये 'आदिवासी शेतकऱ्यांना विजपंप पुरवठा काही निरीक्षणे' या वरील विषयावर संशोधन करून काही निष्कर्ष काढले आहे.

१) महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी १९९२-९३ साली राज्यामध्ये २३,६६० विजपंप (१०० टक्के) मंजूर केले होते. मंजूर करण्यात आलेल्या विजपंपापैकी ३८७३ (१६ टक्के) विजपंप अकार्यक्षम निघाले होते. त्यांचा फायदा आदिवासी लाभार्थी कुटुंबाना झालेला नाही.

२) आदिवासी विकास विभागाकडून मंजूर करण्यात आलेले विजपंप बसविण्यासाठी शासकीय यंत्रणा यशस्वी झालेली दिसून येत नाही.

३) आदिवासी विभाग योजनेच्या लाभ जास्तीत जास्त लोकापर्यंत पोहचावा. शासनाने याकडे लक्ष दिले नाही.

४) आदिवासी विकास विभागाने जास्तीत जास्त शेतकऱ्यांना योजनेत सहभाग करून घेण्यास पुढाकार घेतला.

५) अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांना शेतीसाठी विजपंप योजना ही उपयोगी असून देखील योजना राबविताना काही अडचणी दिसून येतात.

**२६) तेंडूलकर, विभावती आणि पाटील, अनिलता (१९९७) :**

तेंडुलकर आणि पाटील यांनी योजना मासिकातील लेखात ''२१ व्या शतकाच्या उंबरवठ्यावरील आदिवासींचे आरोग्य'' या विषयावर लेख सादर केला. त्यांनी ठाणे विभागातील 'जव्हार मेखाडा' या आदिवासी तालुक्याचा अभ्यास केला. 'सर्वांसाठी आरोग्य' ही घोषणा इ.स. २००० पर्यंत पूर्ण होईल काय? अशी शंका व्यक्त करून काही निष्कर्ष मांडले.

१) ठाणे जिल्ह्यातील जव्हाड- मेखाडा या आदिवासी भागामध्ये मुखतः कॉलरा, मलेरिया, गॅस्टो, डायरिया, हगवन, गोबर, कांजण्या, गलकंड, कावीळ, रात आंधळेपणा टी.बी., खरूज या रोगांचे प्रमाण आदिवासी लोकांत दिसून येतो. तर थोड्या काही प्रमाणात कुष्ठरोगी आढळून आले.

२) या दोन तालुक्यातील आरोग्याच्या संबंधीत आकडेवारी वरून १९९६ या वर्षातील ऑगस्टपर्यंत 'साथ' या उद्रेकामुळे मृत्यूचे प्रमाण ११ टक्के इतके होते तर काही तुरळक स्वरूपातील रोगामुळे मृत्यूचे प्रमाण होते असे दिसून आले.

३) साथीच्या रोगांची लागन झालेल्या १९९६-९७ या वर्षात व्यक्तीची एकूण संख्या ४७२२ इतकी आहे. परंतु मलेरिया झालेल्या व्यक्तीचीं संख्या जव्हार येथे २९२२ आणि मेखाडा येथे ४७४० इतकी होती.

४) जव्हाड-मेखाडा या तालुक्यातील आदिवासी विभाग क्षेत्रातील आरोग्य संबंधित समस्याची कारणामध्ये पिण्याच्या शुद्ध पाण्याचा प्रश्न, गरीब, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता, वैयक्तिक अस्वच्छता, व्यसनाचे वाढते प्रमाण, अंधश्रद्धाळूपणा व चालीरिती रूढी, परंपरा, बालविवाह इ. आहेत.

५) यावर उपाय म्हणून वैयक्तिक स्वच्छतेचे शिबीर घेणे, सार्वजनिक स्वच्छते संबंधित प्रसार-प्रचार सहाय्य शैक्षणिक प्रचार, प्रसार, आरोग्य विषयक जागृती इत्यादी सुचविण्यात आले आहेत.

**२७) सहाय्य, बी.एस. (१९९७) :**

बी.एस. सहाय्य यांनी 'आदिवासी कल्याणाचा मार्ग' या लेखात स्वातंत्र्य अगोदरचे अनुसूचित जमातीचे कल्याण आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या अनुसूचित जमातीचे कल्याणाची दिशा, अनुसूचित जमातीची लोकसंख्या, त्यांचे अनेक प्रश्न, अनुसूचित जमातींच्या सांस्कृतिक आणि जीवनमानाचा अभ्यास केला आहे. त्यात त्याने काही निष्कर्ष मांडले आहे.

१) अनुसूचित जमातीत वेगवेगळ्या वंशाचे लोक आहे, या जमातीचा प्रश्न सुद्धा निरनिराळ्या स्वरूपाचा असतो.

२) आजच्या या युगात आदिवासी शिकार करून जीवन जगतात. त्यांना ''प्रिमिटिव्ह ट्रायबलग्रुप'' आदिवासी संघ असे म्हणतात.

३) जे आदिवासी शेतीमध्ये काम करतात. त्यामुळे त्याचे प्रश्न हा वेगळ्या स्वरूपाचा असतो.

**२८) युनिव्हर्सल बेंचमार्क सर्वेक्षण (१९९७-९८) :**

आदिवासी संशोधन पत्रिकेत १९९७-९८ या वर्षात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने 'युनिव्हर्सल बेचमार्क सर्वेक्षण' या विषयावर संशोधन केले होते. या संशोधनातील काही निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडले.

१) आदिवासी उपाययोजना क्षेत्रात येणाऱ्या ६० टक्के कुटुंबे हे शेती व्यवसायाशी निगडीत आहे.

२) शेतमजूरी करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३८ टक्के एवढे होते.

३) शेती आणि शेतमजूरी करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९८ टक्के एवढे होते.

४) आदिवासी जमातीतील लोकांचे राहणीमान हे शेती आणि शेतमजूरी या क्षेत्राशी संबंधीत आहे.

५) आदिवासी जमातीतील लोक हे डोंगर उत्तरावरील भागात राहत आहेत. शेती ही कोरडवाहू स्वरुपाची असून त्यात प्रमुख पिकामध्ये भात, नाचणी, वरई इत्यादी पिके घेतात.

**२९) पाटील, अशोक डी. (१९९८) :**

पाटील अशोक यांनी मध्यप्रदेशात, राजस्थान आणि गुजरातमध्ये असलेल्या मूळ निवासी भिल्ल समुदायाच्या ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक , सामाजिक व

सांस्कृतिक वेगळेपण दाखवित असताना त्यांच्या समस्या आणि समाधानासाठी समाज व प्रशासनाचे लक्ष्य वेधले आहे.

**३०) जैन, नवीन चंद्र (१९९८) :**

जैन नवीनचंद्र याने 'महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातीच्या शिक्षण, आरोग्य विषयक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी हा झोपडपट्टीत राहणारा आहे. त्यांचा उदरनिर्वाह हे जंगलातील लाकूड आणि वस्तू, मोलमजूरी, मत्सव्यवसाय, शिकार करणे इत्यादी आहे. परंतु त्यांचे जीवनमान जंगलावर अवलंबून राहते जमीनदार आणि सावकार मंडळी आदिवासीची मोठ्या प्रमाणात पिळवणूक करतात.

**३१) बेडसे, मनिषा (२००२) :**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये संशोधकांने नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी मुलीच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास केलेला आहे. अभ्यासातील काही महत्वांचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) जिल्ह्यातील आदिवासी मुलीचे पालक स्वतःच्या शेतीत काम करतात व काही दुसऱ्यांच्या शेतात काम करतात.

२) आदिवासी मुली आपल्या घरी भिल्लोरी भाषा बोलतात.

३) बहुतेक आदिवासी मुलींच्या पालकांना शिक्षणाबद्दल आदर नाही. मुलीना शिक्षण देऊन उपयोग नाही असे त्यांचे मत आहे.

४) वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही. म्हणून बऱ्याच मुली शिक्षण सोडून कामाला जातात.

५) आदिवासी मुलीच्या पालकांना स्वखर्चाने मुलीना शिकविणे परवडत नाही.

६) कुटुंबातील एकूण अपत्य संख्या जास्त असल्यामुळे मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष देणे कठीण जाते.

७) आदिवासी मुलींना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

८) पालक आपल्या मुलीना उच्च शिक्षण घेण्यासाठी परवानगी देण्यास नकार देतात.

९) आदिवासी समाजात मुलीचे लवकर लग्न केले जाते. कारण उच्च शिक्षण घेऊन वय वाढल्याने लग्न जमविण्यास त्रासदायक ठरते.

१०) आश्रमशाळेच्या वस्तीगृहात राहण्याचे व अभ्यासाचे एकच ठिकाण असल्यामुळे त्याच खोलीत वर्ग भरतो.

११) पालकांच्या मते, वस्तीगृहात राहत असतांना मुलीना अनेक अडचणी येतात. जसे पावसाळ्यात जेवणास अडचण येते. संडास बाथरुमची सोय बऱ्याच वस्तीगृहात नाही.

**३२) भट्ट, आशीष (२००२) :**

आशीष भट्ट यांना 'लोकतांत्रिक विकेन्द्रीकरण एवं उभरता जनजातीय' या विषयावर आधारित आपल्या अभ्यासात असे आढळले की, नवीन पंचायतराज व्यवस्थेमध्ये जमातीने नेतृत्व केले आहे. येथे जमातीचे परंपरागत नेतृत्व वेगळे आहे. आता गावातील तडवी/बुजुर्गच्या अपेक्षा युवा वर्गाची पंचायतराजमध्ये सहभागाचा वाटा मोठा आहे. परंतु निरक्षर, अज्ञान आणि कमजोर सामाजिक, आर्थिक स्थितीचा राहणाऱ्या समस्याचा निराकरण स्वतःही आणि पंचायतची भूमिका स्पष्ट केली नाही.

**३३) गुप्ता, मंजु (२००३) :**

गुप्ता मंजू याने 'शिवपूरी' जिल्ह्यात राहणाऱ्या सहारिया जमातींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर स्टेट बँक ऑफ इन्दोरच्या कार्यासंबंधी अभ्यास केला आहे. आपल्या संशोधनात जमातींच्या समस्या दाखवित असताना बँकांकडून कर्ज प्राप्ती करिता येणाऱ्या विविध समस्यामुळे निरक्षर, अज्ञान, बँकाची कार्यप्रणाली, लांब औपचारिक

प्रक्रिया, कर्मचारी धारणा, दलालकडून आदिवासींचा शोषण इत्यादी घटनांचा उल्लेख केला आहे.

**३४) त्रिपाठी, एम.एस. (२००५) :**

एम.एस. त्रिपाठी यांनी 'मध्यभारत की जन जातियों में सामाजिक परिवर्तन की प्रक्रिया : एक अध्ययन' या लेखात त्याने आदिवासींची सामाजिक स्थिती संबंधी निष्कर्ष मांडले आहे.

१) आदिवासीमध्ये अनेक वर्ग, उपवर्ग आणि उपगोत्र अस्तित्वात आहे.

२) मध्यप्रदेश आणि छत्तीसगडची अनुसूचित जमातीचा आर्थिक विकासामध्ये प्रभावकारी परिवर्तन होत आहे. या क्षेत्रामध्ये आदिवासी शिकारी, अन्न गोळा करणे आणि जंगली अर्थव्यवस्थामध्ये शेती अर्थव्यवस्था महत्वाची आहे.

३) अनुसुचित जमातीमध्ये न्याय आणि कायद्याला विशेष महत्व दिले आहे.

४) अनुसूचित जमाती आणि बिगर अनुसूचित जमातीमध्ये आर्थिक फरक आहे.

**३५) मुणगेकर भालचंद्र (२००६) :**

भालचंद्र मुणगेकर यांनी दलित आणि आदिवासी जनतेचा 'आर्थिक विकास व सामाजिक न्याय' या बाबतीत आपले मत व्यक्त केले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या प्रामुख्याने खेड्या-पाड्यात वास्तव करून राहतात. पूर्व ग्रह या फरकामुळे सर्व प्रकारचे सामाजिक, शिक्षण, आर्थिक रोजगार विषयक, आरोग्य सोयीसुविधा, स्वच्छता, सरासरी आर्युमान इत्यादी घटकांचा सामाजिक आणि आर्थिक बाबतीत देशातील इतर समाजाच्या मागे आहेत असे दिसून येते. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती बरोबर सामाजिक मागासवर्गीय यांच्या चांगल्याकरिता आदिवासी आणि दलित उपयोजनांचा काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**३६) तेगमपुरे, मारोती (२००६) :**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये मारोती तेगमपुरे यांनी नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाला शासकीय उपायोजनांच्या झालेल्या लाभाचे अध्ययन केलेले असून काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) किनवट तालुक्यामध्ये ६१.२७ टक्के आदिवासी शेतमजुरी करतात. तर ३३.८७ टक्के आदिवासी शेती करतात. तालुक्यात शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या आदिवासीचे प्रमाण जवळपास ४५ टक्के एवढे अधिक असल्याचे स्पष्ट होते.

२) किनवट तालुक्यातील आदिवासींना त्यांच्या उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न शेतीतून प्राप्त होते. तर २१.२९ टक्के उत्पन्न हे शेतमजूरीद्वारे मिळते.

३) तालुक्यातील ५० टक्के आदिवासी लाभार्थी अजुनही निरक्षर असून ३३टक्के आदिवासीचे केवळ प्राथमिक शिक्षण झाले आहे. आदिवासी उपयोजनेद्वारे शिक्षणावर खर्च करुनही आदिवासीचे निरक्षरतेचे प्रमाण कमी करणे शक्य झाले नाही.

४) किनवट तालुक्यातील नमुना निवडीतील ४४ टक्के आदिवासींना वर्षासाठी ५१ ते १०० दिवस रोजगार प्राप्त होतो. या रोजगारांच्या मोबदल्यात दिली जाणारी मजूरी ही अल्पच असल्याचे दिसून आले. ६२ टक्के लाभार्थीना दिवसाकाठी रु.४१ ते ५० इतकीच मजूरी प्राप्त होते. तर ३५ टक्के आदिवासींना केवळ रु. १० ते ४० पर्यंतच मजूरी मिळते.

५) आदिवासी उप-योजनेच्या माध्यमातून आदिवासींना मंजूर झालेली रक्कम आणि प्रत्यक्ष मिळालेली रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे.

६) तालुक्यात आदिवासी उप-योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यामध्ये अंमलबजावणीच्या संदर्भात कमालीची अनास्था दिसून येते.

७) आदिवासी उप-योजनेच्या लाभार्थी संदर्भात, खर्चासंदर्भात कुठलीच अद्यावत माहिती आदिवासी उप-योजनेची अंमलबजावणी करणारे कार्यालय किंवा संबंधीत अधिकारी ठेवीत नाहीत. मजुरांना दिलेल्या मजुरीचे नोंदणी पुस्तिका देखील मिळाली नाही. त्यामुळे खर्चाचा आणि लाभार्थीचा मेळच बसत नाही.

८) किनवट तालुक्यातील आदिवासी खेड्यात अजूनही आरोग्यांच्या सोयीचा, पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा सोयीचा अभाव आहे. त्यांना तालुक्यांचे विहिरीचे, शेततळ्यातील उपयोजनेअंतर्गत आदिवासी खेड्यातील स्वच्छता व पाणी पुरवठ्यावर बऱ्यापैकी खर्च होऊनही स्वच्छता आणि पाणी पुरवठ्यांची खेड्याची दुर्दशा सांगते.

९) किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेद्वारे आदिवासीकरिता अनेक रोजगारांचे कार्यक्रम राबविण्यात आले. त्यासाठी इतर विकास कार्यक्रमाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणांत खर्चही करण्यात आला. परंतु आदिवासींना अजूनही रोजगारांच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत. बेरोजगाराने गरिबीच्या गर्तेत अडकलेली तरुणांनी बरीच संख्या आदिवासी खेड्यामध्ये आढळून आली.

**३७) कोकाटे, चंद्रकात (२००८) :**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये संशोधकांनी हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन केले आहे. अभ्यासातील महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाने आहेत.

१) महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यात आदिवासींची कमी अधिक प्रमाणात वस्ती असून राज्यातील जमातीची संख्या ४७ एवढी आहे.

२) राज्यात आढळणारे आदिवासी जमाती तसेच उपजमाती विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेत असून त्यांच्या समस्यांचे स्वरुपही भिन्न आहे.

३) आदिवासी समाजात अंधश्रध्देचे प्रमाण बरेच मोठे असून त्यांचा भोंदूबाबा, भानामती, करनी, जादूटोणा, यासारख्यावर विश्वास आहे. त्यामुळे आदिवासी

समाजातील लोक मांत्रिकाचा आधार घेतात. तसेच विविध ग्राम देवतांना नवस करतांना दिसून येतात.

४) आदिवासी समाजामधील असलेले प्रचंड दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान तसेच आदिवासी भागात असलेल्या आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे कुपोषणांची समस्या दिसून येते.

५) शेती व शेतमजुरीवर अवलंबून असणारे जीवन, निरक्षरता, निसर्गावरील अवलंबित्व यामुळे आदिवासी लोक आर्थिक दृष्ट्या मागासलेले दिसून येतात.

६) जंगलाचे कमी होत असलेले प्रमाण तसेच जंगलविषयक जाचक कायदे यामुळे आदिवासी लोकांच्या जीवनात विपन्नावस्था निर्माण झाली आहे.

७) १९९७-९८ च्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना मार्गदर्शक परिपत्रकानुसार वार्षिक उत्पन्नाआधारे ३८ टक्के आदिवासी कुटुंबे ही दारिद्र्य रेषेखाली येतात.

८) उपभोग्य वस्तूंचा तसेच चैनीच्या व टिकावू वस्तूंच्या वापराचे प्रमाण आजही अल्प आहे. या कारणाने आदिवासीचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.

९) उत्पन्नांची साधने मर्यादीत असल्यामुळे दैनदिन उपभोगासाठी आदिवासींना सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागतो.

१०) आदिवासी मुलामुलीमधील शिक्षणांचे प्रमाण आधिक असले तरी शैक्षणिक गळतीचे प्रमाण मोठे आहे.

११) जिल्ह्यात सीमांत व अल्प भूधारकांची संख्या मोठी असून शेती व्यवसाय कोरडवाहू स्वरुपांचा आहे.

१२) समाज कल्याण विभाग व आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ सर्वच आदिवासी पर्यंत पोहचत नाही.

१३) जिल्ह्यातील आदिवासीमध्ये सामाजिक संघटनांचा अभाव दिसून येतो.

**३८) इंगळे, जयवंत शंकरराव (२०१०) :**

इंगळे जयवंत शंकरराव यांनी 'ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींचा शेतीविषयक अभ्यास' या लेखात आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांनी शेती व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जासंबंधी माहिती दिली असून आदिवासींच्या शेतजमिनीची वैशिष्ट्ये, आदिवासींच्या असलेल्या समस्या इत्यादीची माहिती दिली आहे. यावरून काही निष्कर्ष मांडले आहे.

१) आदिवासी जमातीत गरिबी मोठ्या प्रमाणात असून ते भूमिहीन आहे. त्यामुळे ते दुसऱ्यांची शेतजमीन खंडाने करतात, आणि सीमांत शेतकरीसुद्धा खंडाने जमीन घेऊन करतात.

२) आदिवासी जमातीत सीमांत शेतकरी आणि लहान शेतकऱ्याचे संख्या जास्त असून ती ७८.९ टक्के इतकी आहे. सहा ते दहा एकर शेती असणाऱ्या मध्यम शेतकऱ्यांची टक्केवारी ११.४१ एवढे आहे. १०.५ टक्के कुटुंबाकडे ११ एकर व त्यापेक्षा जास्त शेतजमीन आहे.

३) या तालुक्यातील आदिवासींकडे स्वतःची जमीन सरासरी ५.५२ एकर एवढी आहे. तसेच २५ ते ३५ टक्के जमीन नापीक असल्यामुळे पिकासाठी योग्य नसून ती जमीन लागवडी खाली आणली जात नाही.

४) आदिवासी समाजातील शेतकऱ्यांना शेतीसाठी एकरी वार्षिक खर्च ९७४.१३ रूपये एवढे आहे. तर दर एकरी वार्षिक उत्पन्न १४९८.६७ रूपये इतके आहे. तर दर एकरी वार्षिक निव्वळ नफा ५२४.५४ रूपये इतके दिसून येते.

५) आदिवासी लोकांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोण हा केवळ उदरनिर्वाहाचे साधन हा आहे. या शेतीपासून या लोकांची तीन ते चार महिने उपजीविका घेतात. इतके अन्नधान्य त्या शेतीत तयार होते.

**३९) सुर्यवंशी, रमेश (२०१०) :**

रमेश सुर्यवंशी यांनी 'आदिवासी ठाकर समाजशास्त्रीय अभ्यास' या पुस्तकात ठाकर समाजाचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, कौटुंबिक जीवन, राजकीय जीवन, धार्मिक जीवन आणि शैक्षणिक जीवन या संबंधीत अभ्यास केला. त्याने काही निष्कर्ष खालीलप्रमाणे मांडले आहे.

१) ठाकर जमात कोणत्याही प्रकारचे वाईट कृत्य करत नाही.

२) आदिवासी ठाकर जमातीला शासनाच्या नोकरशाहीने संपूर्ण दुर्लक्ष केले आहे.

३) अंजिठा डोंगर परिसरातील ह्या ठाकराचे वास्तव्य या डोंगरात स्वातंत्र्यपूर्व काळापासून आहे.

४) शासन दरबारी या डोंगरकडेला आदिवासी ठाकर ही जात असल्याबाबतची नोंद नसल्याने या जमातीतील लोकांना आदिवासी म्हणून प्रमाणपत्रे मिळत नाही.

५) महाराष्ट्रातील इतर भागातील आदिवासी ठाकर आणि अंजिठा डोंगर परिसरातील हे आदिवासी ठाकर यांचे नाते संबंध आहे.

६) इतर आदिवासी प्रमाणे हे आदिवासी ठाकर पूर्णतः जंगलावर वनस्पतीवर विसंबून आहेत.

७) त्यांचा राजकीय जीवनाचा विचार करता या ठाकरमध्ये इतर आदिवासीप्रमाणे जातीपंचायत अधिक प्रभावी आहे.

८) भ्रष्ट नोकरशाही ही प्रस्थापितांच्या बाजूने आहे.

९) शैक्षणिक बाबींचा विचार करता अंजिठा डोंगर परिसरातील ठाकरांचे शिक्षणातील प्रगती म्हणावे तेवढे समाधान मानता येणार नाही.

**४०) राजपुत, उदयसिंह (२०१०) :**

उदयसिंह राजपुत यांनी आपल्या ''आदिवासी विकास एवं गैर सरकारी संघटन'' या ग्रंथात मध्यप्रदेशातील झाबुआ जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा अभ्यास केला आहे. त्याने काही निष्कर्ष मांडले आहे.

१) या संघटनांना सरकाराकडून मदत करताना नीती निर्माणमध्ये भागीदारी वाढवावी.

२) या क्षेत्रात संघटना सामान्य वाढविणे आणि संसाधनाची देवाण-घेवाण करताना या क्षेत्राचा विकास करावा.

३) या संघटनेकडून लहान-लहान तलाव, स्टाप डेम, डक्क इत्यादी केल्याने वर्षभर पाणी मिळेल, या क्षेत्राचा विकास होईल. या संघटनाच्या कार्यात जमिनी गुणवत्ता घेण्यसाठी आणि कामगाराला कामाचा मोबदला, वेतन आणि सुविधा द्यावी.

**४१) आरूलसेत्वम, के. आर. महेश्वरी :**

आरूलसेत्वम के आर. महेश्वरी यांनी 'आदिवासींची सध्याची लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये : एक व्यष्टी अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनामध्ये २००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची मांडणी करून त्याने आदिवासींची सामाजिक आणि आर्थिक वैशिष्ट्ये सांगितलेली आहे. हे संशोधन प्राथमिक आणि द्वितीय साधन सामग्रीवर आधारित आहे. या संशोधकानी मांडलेले काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१) संशोधकांनी अनुसूचित जमातीच्या व्यवसायासंबंधीत माहिती आणि लोकसंख्या विषयक वैशिष्ट्ये यातील संबंध स्पष्ट केला आहे.

२) आदिवासी जमातीतील व्यक्तीमध्ये स्वयंरोजगार निर्मिती कमी प्रमाणात आहे. त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. त्याचबरोबर अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, उपक्रमशिलतेचा अभाव व उत्पादकता कौशल्याचा अभाव आहे.

३) आदिवासी समाजाचा विकास आधारभूत सेवा व सुविधेच्या कमतरेमुळे झाला नाही. त्यामुळे या भागातील आदिवासी लोकांना शिक्षण व प्रशिक्षण देऊन सर्वांगीण विकास करता येईल.

**४२) चव्हाण, सीमा रविंद्रं (२०११) :**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये संशोधकांनी शासकीय उपयोजनांचा जळगांव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील पारधी समाजावर झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनातील काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) नमुना कुटुंबांचे साक्षरता प्रमाण ४९.०७ टक्के एवढे आहे.

२) नमुना कुटुंबातील कर्त्या व्यक्तीपैकी प्राथमिक क्षेत्रात ८०.८७ टक्के लोक, द्वितीय क्षेत्रात १३.१३ टक्के आणि तृतीय क्षेत्रात ५.१९ टक्के लोक काम करत आहे.

३) नमुना कुटुंबातील ४३.३३ टक्के भूमिहीन शेतमजूरांची कुटुंबे आहेत. ३२.८६ टक्के सीमांत शेतकऱ्यांची आणि २३.८टक्के अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या आहे.

४) नमुना कुटुंबातील ५६.६७ टक्के कुटुंबांची असणारी २.१६ एकर क्षेत्र धारण केलेले आहे. त्यापैकी ८०.६७ टक्के कोरडवाहू आणि १९.३३ टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे.

५) नमुना कुटुंबातील जवळपास ६८ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रु. २० हजारापेक्षा कमी आहे. म्हणजेच हे कुटुंब दारिद्र्या रेषेखालील जीवन जगत आहे.

६) नमुना कुटुंबातील अन्नधान्यावरील खर्चाचे प्रमाण ७३.५ टक्के,अन्नधान्याव्यतिरिक्त बाबीवरील खर्चाचे सरासरी टक्केवारी २६.५ टक्के पेक्षा कमी आहे.

७) नमुना कुटुंबातील ८५.७१ टक्के कुटुंबानी कर्ज घेतले आहे. तर १४.२९ कुटुंबाची कर्ज घेतलेली नाही.

८) नमुना कुटुंबातील ७६.१९ टक्के कुटुंब कमी अधिक बचत करतात. तर २३.८ टक्के बचत करत नाही.

**४३) वर्मा, गीता आणि गोंड, रविकुमार (२०१२) :**

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने मध्यप्रदेशातील झाबुआ जिल्ह्यातील भील या आदिवासी जमातीविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. भील समाज हा मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात व महाराष्ट्र या राज्यात आढळून येतो. भीलांचा उगम द्रविडियन भाषाची ठठ शब्दापासून तयार झाला आहे. धनुष्य बाळगणाऱ्यांना भील नाव दिले आहे. भीलाचे शरीर रचना चांगल्या प्रकारे आहे. तसेच दिसायला सुंदर आणि ताम्रवणी असते. परंतु जंगलात राहून त्यांचा रंग काळा झाला आहे. यात वस्त्र आचार-विचार, खान-पान, मादक पेय, निवास भील्ल लोकेत्सव, जाती, गोत्र, संस्कार आणि प्रथा या संबंधी माहिती दिलेली आहे.

**४४) भागडे, पोपट मच्छिंद्र (२०१२) :**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये संशोधकांनी ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक सामाजिक स्थितिचे अध्ययन केले आहे. त्यांच्या संशोधनातील काही महत्वांचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) जिल्ह्यातील आदिवासी जमातीत विभक्त कुटुंब पध्दती प्रचलित असून कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या सहा एवढी आहे.

२) जिल्ह्यातील १२ टक्के आदिवासी निरक्षर असून निरक्षरामध्ये वयोवृध्द व्यक्तीचे प्रमाण अधिक आहे.

३) आदिवासी गावात, पाड्यात प्रशिक्षित डॉक्टरांची खूपच कमतरता आहे.या भागात अनेक बनावट डॉक्टर आदिवासीवर उपचार करुन आदिवासीची आर्थिक लुट करतांना दिसून येतात.

४) जिल्ह्यातील ५६ टक्के आदिवासी कुटुंबानी शौचालय बांधलेले आढळून आले नाही.

५) जिल्ह्यातील आदिवासींच्या रोजगारांचे मुख्य साधन शेती आणि मजुरी हे आहेत. येथील ३९ टक्के आदिवासी शेती करतांना आणि ४६ टक्के आदिवासी मजूरी करतात.

६) जिल्ह्यातील दुर्गम भागात पुरेशा रोजगार सुविधा उपलब्ध नसल्यामुळे २१ टक्के आदिवासी रोजगारासाठी स्थलांतर करतात.

७) ठाणे जिल्ह्यातील ८८ टक्के आदिवासींचे राहणीमान खालावलेले आहे.

८) वार्षिक रु.२५०० च्या आत उत्पन्न असणाऱ्या आदिवासीचे प्रमान ४७ टक्के एवढे आहे.

९) रोजगार सुविधांच्या कमतरतेमुळे अर्थाजनासाठी कर्ज घेणाऱ्या आदिवासीचे प्रमाण ६० टक्के एवढे आहे.

१०) जिल्ह्यातील ५४ टक्के आदिवासी दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे.

११) ५० टक्के आदिवासीचा मासिक उपभोग खर्च वस्तूवरील खर्च १००रु. पेक्षा कमी आहे.

१२) शासकीय योजनाबाबत आदिवासी लोकामध्ये मोठ्या प्रमाणात उदासिनता दिसून येते.

१३) दुर्गम भागातील आदिवासी पाड्यापर्यत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

१४) जिल्ह्यातील दुर्गम भागात पुरेशा रोजगार सुविधा उपलब्ध नसल्यामुळे २१ टक्के आदिवासी रोजगारासाठी स्थलांतर करतात.

**४५) डोईफोडे, रामेश्वर श्रीराम (२०१२):**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये संशोधकाने आदिवासी कोलाम जमातींच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन व भार्षिक अभ्यास केलेला आहे. महाराष्ट्रात कोलाम हे लोक लोकसंख्येने यवतमाळ व नांदेड या जिल्ह्यात सर्वाधिक असून चंद्रपूर, वर्धा आणि आंध्रप्रदेशातील आदिलाबाद या जिल्ह्यातही कोलाम वस्त्या आहेत. कोलाम जमात आजही विकास व प्रगतीपासून दूर असून रोजमंजूरीवर गुजरान करुन उदरनिर्वाह करतात. स्वतःची शेती नसल्याने परिसरात उपलब्ध होणाऱ्या रोजगारावर पूर्णतः अवलंबून आहे. परिसरात गुरे सांभाळणे, शेतावर मजूरीची कामे करणे, कापूस वेचने अशी कामे उपलब्ध होत असल्याने त्यांचा दैनंदिन घरखर्च भागविला जातो. त्यामुळेही जमात आजही गरिबींचे जीवन जगत आहे. घरातील स्त्री-पुरुषांना रोजगारासाठी दिवसभर घराबाहेर जावे लागत असल्यामुळे लहान भावंडाना सांभाळण्याची जबाबदारी असणाऱ्या शाळेतील मुलांना स्वतःचे शिक्षण पूर्ण करता येत नाही.

कोलाम लोक एकाच घरात राहत असून घरातच शेळ्या पाळतांना दिसतात. त्यामुळे घाण वाढून घरात रोगजंतू वाढून आजार होतात. पैशाअभावी अशा आजारात भगताची मदत घेतात. किंवा खेड्यातील डॉक्टराकडून उपचार करुन घेतले जाते. त्यामुळे आरोग्य विषयक जागृती करुन शासकीय आरोग्य योजना कोलामापर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. शासनाच्या अनेक योजना कोलामाना माहिती नाही. ज्या माहिती आहेत. त्या योजनाचाही शिक्षणाअभावी कोलाम फायदा घेवू शकत नाही. तसेच अनेक कोलामाकडे स्वतःचे बँक खाते नाही.

## ४६) Raj Kumar. P, Pulla Rao (2013) :

प्रस्तुत संशोधन लेखात संशोधकांनी आंध्रप्रदेशामधील जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे. काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) एकूण नमुना ८९ कुटुंबापैकी ८४ कुटुंब प्रमुख हे पुरुष आणि ०५ कुटुंब प्रमुख हे स्रीया आहेत.

२) एकूण नमुना ८९ कुटुंबापैकी ६२(६९.६७ टक्के) कुटुंब हे कोंडाडोरा, २६ (२९.२१ टक्के) कुटुंब हे नुकाडोरा आणि ०१(०१.१२ टक्के) कुटुंब हे वाल्मीकी आदिवासी कुटुंब आहे.

३) एकूण नमुना कुटुंबात ९२७ लोकसंख्या असून त्यापैकी पुरुषांची संख्या १९२(५१.८९ टक्के) आणि स्त्रीयांची संख्या १७८(४८.११टक्के) एवढी आहे. स्त्री -पुरुष गुणोत्तर ९२७ एवढा असून सरासरी कुटुंबाचा आकार हा ४.१६ एवढा आहे.

४) एकूण नमुना कुटुंबापैकी ०४ कुटुंबाकडे रेडिओ, १ कुटुंबाकडे टेलिफोन, ३० कुटुंबाकडे सायकल आणि ४४ कुटुंबाकडे बैलगाडी आहे.

५) एकूण नमुना कुटुंबापैकी ७९(८८.७६टक्के) कुटुंबाकडे स्वतःची जमीन असून १० (११.२३टक्के) कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन नाही.

## ४७) Shankar, R. and Manimaran (2013) :

प्रस्तुत संशोधनपर लेखात संशोधकांनी तामीळनाडू राज्यातील तिरुचिरपल्ली जिल्ह्यातील पचमलाई या आदिवासी जमातीचा अभ्यास केला असून काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) एकूण नमुना आदिवासी उत्तरदात्यापैकी ५७ टक्के कुटुंब हे विभक्त कुटुंब असून ४३ टक्के हे संयुक्त कुटुंब आहे.

२) एकूण नमुना आदिवासी उत्तरदात्यापैकी ३१ टक्के उत्तरदाते हे साक्षर असून ६९ टक्के उत्तरदाते हे निरक्षर आहेत.

३) एकूण नमुना आदिवासी  कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंब हे शेती वर, २५टक्के कुटुंब हे जंगलातील कामावर १३ टक्के, कुटुंब हे शिकारीवर आणि १२ टक्के कुटुंब हे जिनिग उद्योगावर अवलंबून आहेत.

४) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी एक हजार ते दोन हजार मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या ४३ टक्के  २ हजार ते ३ हजार मासिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३७ टक्के, तीन हजार ते चार हजार मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाची टक्केवारी ११ टक्के असून ते चार हजार रुपयापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या केवळ ९ टक्के आहे.

५) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी ६० टक्के कुटुंब प्रमुखाना विषमज्वर, १६ टक्के कुटुंबप्रमुखांना काजण्या, १३ टक्के कुटुंब प्रमुखांना हिवताप आणि ११ टक्के कुटुंबप्रमुखांना डांग्या खोकल्याचा आजार आहे.

६) एकूण नमुना आदिवासी कुटुंब प्रमुख्यापैकी ६७ टक्के कुटुंब प्रमुखांना व्यसनांची सवय असून ३३ टक्के कुटुंब प्रमुखांना कसलीच सवय नाही.

७) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी २३ टक्के कुटुबांपैकी ६७ टक्के कुटुंबांनी खाजगी दवाखान्यात, ५३ टक्के कुटुंबानी सार्वजनिक दवाखान्यात आणि २४ कुटुंबानी पारंपरिक उपचार पध्दती घेतली.

## **४८)Kispotta, Seraphinus (2014) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी छतीसगड राज्यामधील धनवार आणि सुरगुजा जिल्ह्यातील गावाचा व्यष्टी अध्ययन पध्दतीने अभ्यास केलेला असून अभ्यासातील काही निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) एकूण २३५ नमुना आदिवासी कुटुंबामध्ये एकूण १६२५ लोकसंख्या असून पुरुषांची संख्या ८३१ आणि स्त्रियांची संख्या ७९४ एवढी आहे. लिंग गुणोत्तर प्रमाण ९५५ एवढा आहे.

२) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी ५१(५१टक्के) उत्तरदाते हे निरक्षर आहेत.

३) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी एक एकरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या कुटुंबांची संख्या ७८ टक्के १.१ एकर ते ४.९ एकर जमीन असणाऱ्या कुटुंबांची संख्या १८ टक्के आणि ५ एकर पेक्षा जास्त जमीन असणाऱ्या कुटुंबाची संख्या ४ टक्के एवढी आहे.

४) एकूण नमुना आदिवासी कुटुंबांपैकी घराचे कच्चे बांधकाम असणाऱ्या कुटुंबांची संख्या ८८ टक्के, अर्धे कच्चे बांधकाम असणाऱ्या कुटुंबांची संख्या १० टक्के आणि पक्के बांधकाम असणाऱ्या कुटुंबांची संख्या २ टक्के एवढी आहे.

५) एकूण नमुना उत्तरदात्यापैकी ७२ टक्के उत्तरदात्यांना मलेरिया, १७ टक्के उत्तरदात्यांना खोकला, ताप ०२ टक्के उत्तरदात्यांना श्वसनाविषयी समस्या, ०६ टक्के उत्तरदात्यांना न्युमोनिया आणि ०३ टक्के उत्तरदात्यांना अतिसार इत्यादी व्याधी आहेत.

**४९) करंडे, संदीपान (२०१४) :**

प्रस्तुत शोध प्रबंधात संशोधकांनी ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास केला आहे. त्यांनी केलेल्या संशोधनातील महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) भारतीय राज्यघटनेनुसार देशात एकून ६४५ प्रमुख आदिवासी जमाती असून त्यापैकी ४७ जमाती या महाराष्ट्रात आहेत.

२) हिंदू धर्माच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासी लोकांची मूळ संस्कृती, चालीरिती, रुढी, परंपरा, लोप पावत आहे.

३) वारली समाजामधील निरक्षरता, दारिद्र्य, अंधश्रध्दा, तसेच पाड्यांच्या ठिकाणी आरोग्य सुविधांचा असणारा अभाव यामुळे कुपोषणासारखी समस्या निर्माण झाली आहे.

४) वारली समाजातील पुरुष साक्षरता ३९.०४ टक्के तर स्त्री साक्षरता ३१.०५ टक्के आहे. ६ ते २१ वयोगटातील मुलांची साक्षरता ९१.२६ टक्के तर याच वयोगटातील मुलींची साक्षरता ७८.५२ टक्के आहे.

५) वारली समाजातील साक्षरतेचा एकत्रित दर ५७.७४ टक्के एवढा आहे.

६) शिक्षणाच्या प्रसारामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी इच्छित बाबी साध्य करण्यासाठी देव- देवताना नवस करण्यांचे प्रमाण ९२.३३ टक्के असल्याचे दिसून आले.

७) वारली समाजाचे राहणीमान अतिशय निकृष्ट व निम्न दर्जाचे आहे. कारण आवश्यक व परिपोषक वस्तूंच्या उपभोगापासून वंचित असणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी ६० ते ७० टक्के आहे.

८) चैनीच्या वस्तुच्या उपभोगापासून वंचित असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे.

९) महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व जलसंसाधन विभागाच्या दारिद्र्य गणना (२००२-२००३) निकषानुसार बहुतांश आदिवासी कुटुंब दारिद्र्य रेषेखाली दिसून आले.

१०) जिल्ह्यातील ७९.६७ टक्के आदिवासीकडे शेती असली तरी ती अतिशय सीमांतिक स्वरुपांची आहे.

११) जिल्ह्यातील वारली समाजाकडे शेतीसाठी आवश्यक असणारी सिंचनाची सुविधा अतिशय नगण्य आहे.

१२) वारली समाजात स्वंयरोजगाराचे प्रमाण केवळ ७.३३ टक्के आहे.

१३) महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभाग आणि आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ सर्वापर्यंत पोहचत नाही.

१४) उत्पन्नाची साधने मर्यादीत असल्यामुळे दैनंदिन उपभोगासाठी आदिवासीना सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागतो.

## ५०) Selva, Kumar and Siva, Kumar (2014) :

प्रस्तुत लेखात संशोधकाने तामीळनाडू राज्यातील नीलगीरी जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा समाजिक आर्थिक अभ्यास केलेला असून काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रकाणे आहे.

१) २०११ च्या जनगणनेनुसार निलगिरी जिल्ह्यातील आदिवासी समाजाची एकूण लोकसंख्या ७,३५,३९४ एवढी असून त्यापैकी पुरुषांची एकूण लोकसंख्या ३,६०,१४३ आणि स्त्रियांची एकूण लोकसंख्या ३,७५,२५१ एवढी आहे.

२) २०११ च्या जनगनेनुसार निलगीरी जिल्हातील आदिवासी समाजाची एकूण साक्षरता दर ८५.२० टक्के एवढा असून त्यापैकी पुरुष साक्षरता दर ९७.७२ टक्के आणि स्त्री साक्षरता दर ७८.९८ टक्के एवढा आहे.

३) निलगीरी जिल्ह्यातील एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्याही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे.

४) २००८-०९ मध्ये निलगीरी जिल्ह्यातील सामाजिक सेवावर १२.४७ खर्च केला होता. आणि २००९-१० मध्ये १५.४५ टक्के एवढा सामाजिक सेवा खर्च केला होता. थोडक्यात पहिल्या वर्षापेक्षा दुसऱ्या वर्षात ३.१४ टक्के खर्च जास्त करण्यात आला.

**५१) बेरळीकर, प्रमोद बालाजीराव (२०१५) :**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये संशोधकांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे. संशोधनातील काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे.

१) जिल्ह्यातील ८१.६६ टक्के पारधी व्यक्तीचा आधुनिकीरकणामुळे पोशाख पध्दतीत बदल झाल्याचे वाटते.

२) जिल्ह्यातील ३६.६६ टक्के पारधी व्यक्ती केवळ कुटुंबाच्या उदरनिर्वासाठी भटंकती करतात.

३) जिल्ह्यातील निवडक व्यक्ती पैकी ९४.१६ टक्के पारधी व्यक्ती वैवाहिक रितिरिवाजाचे काटेकोर पालन करतात.

४) जिल्ह्यातील निवडक पारधी व्यक्तीपैकी ५.८३ टक्के कुटुंबे ही संयुक्त आहे.

५) जिल्ह्यातील ४४.५८ टक्के निवडक पारधी व्यक्ती मजुरी करतात. औद्योगिक क्षेत्रात मजुरी करण्याऱ्या निवडक पारधी व्यक्तीची संख्या ७.९४ टक्के इतकी आहे. बांधकाम क्षेत्रात मजुरी करणाऱ्या निवडक पारधी व्यक्तीची संख्या ४.५८ टक्के आहे.

६) जिल्ह्यातील निवडक पारधी व्यक्तीकडे पैकी १३.३३ टक्के लोक शेतकरी आहे.

७) जिल्ह्यातील १३.३३ टक्के पारधी व्यक्तीकडे स्वतःच्या मालकीची जमीन असून त्यापैकी १८.७६ निवडक पारधी व्यक्तीकडे एक ते चार हेक्टर दरम्यान बागायत जमीन आहे. तर ८१.२४ टक्के निवडक पारधी लोकाकडे जिरायत जमीन आहे.

८) जिल्ह्यातील निवडक व्यक्ती पैकी ५.८३ टक्के पारधी व्यक्ती विविध क्षेत्रात नोकरीस आहे.

९) जिल्ह्यातील १०.८४ टक्के निवडक पारधी व्यक्ती छोटे छोटे व्यवसाय करतात.

१०) जिल्ह्यातील ५.००टक्के निवडक पारधी व्यक्तीचा दरमहा उपभोग खर्च २००० पेक्षा कमी आहे. ७८.४४ टक्के पारधी व्यक्तीचा मार्सिक उपभोगखर्च २००ते ५०० रु. च्या दरम्यान आहे. आणि १६.६६ टक्के व्यक्तीचा उपभोग खर्च ५०० रु. पेक्षा जास्त आहे.

११)जिल्ह्यातील ४७.९१ टक्के पारधी व्यक्तीनी विविध कारणासाठी कर्ज घेतलेले आहे.

१२)जिल्ह्यातील एकूण पारधी व्यक्तीपैकी २३.७५ टक्के पारधी व्यक्तीनी शासकीय योजनांचा लाभ घेतलेला आहे.

**५२) सूर्यवंशी, शिवानंद (२०१५):**

प्रस्तुत शोध प्रबंधात संशोधकांनी नांदेड जिल्ह्यातील आदिवासी स्त्रीयांचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासातील काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे साक्षरतेचे प्रमाण ३२ टक्के एवढे आहे.

२) नमुना कुटुंबातील आदिवासी महिला आरोग्यांच्या बाबतीत फारशा जागृत नाही. आजही महिलांचा भगत, जादूटोणा, दैवी शक्ती या बाबीवर अधिक विश्वास आहे.

३) अप्रगत शेती व अल्पशा शेतमजुरीवर अवलंबून असणारे जीवन, निसर्गावरील अवलंबत्व असणारे जीवन, निरक्षरता निसर्गावरील अवलंबत्व यामुळे नमुना महिला कुटुंब आर्थिक दृष्ट्या मागासलेले दिसून येतात.

४) उपभोग्य वस्तूचा तसेच चैनीच्या व टिकावू वस्तूच्या वापराचे प्रमाण अल्प आहे. परिणामी जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे आहे.

५) उत्पन्नाच्या मर्यादीत साधनामुळे नमुना कुटुंबातील महिलांना सावकारी कर्जाचा आधार घ्यावा लागतो.

६) नमुना कुटुंबातील मुलांच्या तुलणेत मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आहे.

७) आदिवासी महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता शासनाच्या विविध विभागाकडून राबविणात येणाऱ्या योजनांचा लाभ खऱ्या गरजूना मिळत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या विकासात या योजनांचा फारसा उपयोग झाल्याचे दिसत नाही.

८) आधुनिक जगाच्या संपर्कामुळे आदिवासींच्या संस्कृतीवर त्यांचा परिणाम होत असून त्यांची मूळची वैशिष्ट्ये व परंपरा लोप पावत चालली आहे.

९) जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबामध्ये सीमांत व अल्पभूधारकांची संख्या अधिक असून शेती व्यवसाय कोरडवाहू स्वरुपाचा आहे.

**५३) गंगणे, वर्षा (२०१५) :**

वर्षा गंगणे यांनी आपला शोध प्रबंध प्रकाशित केलेला असून संशोधनातील काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) आदिवासी जमाती जंगली प्रदेश व डोंगरदऱ्यात व एकांतात राहणे अधिक पसंद करतात.

२) आदिवासीना आधुनिक काळात 'वनवासी' न म्हणता 'अनुसूचित जमाती' असे संबोधले जातात.

३) पूर्णतः मागास अवस्थेत (वन्य) असलेल्या आदिवासी स्त्रियांची संख्या आधुनिक काळात कमी झाली असून अर्धवट सुधारलेल्या व शेतीभाती करणाऱ्या आदिवासी जमाती दिसून येतात.

४) इतर सामान्य स्त्रियांपेक्षा आदिवासी स्त्रियांची जीवनशैली व विचार पध्दती वेगळी असल्याचे दिसून येते.

५) आदिवासी समाजात पुरुषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक असून समाजात स्त्रियांना कुटुंबात आदरांचे स्थान व समान दर्जा दिला जातो.

६) आदिवासी जमातील विभक्त कुटुंब पध्दती प्रामुख्याने दिसून येते.

७) आदिवासी स्त्रियांना स्थायी स्वरुपांचा रोजगार उपलब्ध नाही. तसेच आदिवासी स्त्रियांच्या संघटना नसल्यामुळे त्यांची सौदा शक्ती कमी आहे.

८) आदिवासी स्त्रियांच्या सर्व समस्यांचे मूळ आर्थिक समस्या व प्रश्न असून आदिवासी स्त्रियांच्या समस्यांचे स्वरुप अत्यंत गुंतागुतीचे आहे.

९) आदिवासी स्त्रियांना त्यांच्या कामाचा आर्थिक मोबदला अनियमित व कमी दिला जातो. तसेच बहुसंख्य आदिवासी स्त्रिया गरिब असल्याचे व निम्न राहणीमानात जगत असल्याचे स्पष्ट होते.

१०) आदिवासी स्त्रियांच्या शेतमालाला तसेच वनसंपत्तीला योग्य भाव मिळत नसल्याचे दिसून येते.

११) आदिवासी जमातीत बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे तसेच कुपोषणांची समस्या गंभीर असल्याचे स्पष्ट होते.

१२) दुर्गम व ग्रामीण भागात आदिवासी स्त्रियांसाठी प्राथमिक आरोग्य विषयक सोयी उपलब्ध नाहीत.

१३) आदिवासी समाजात आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढत आहे.

१४) शिक्षणाअभावी व पारंपरिकतेमुळे आदिवासी स्त्रियांची वैचारिक पातळी कमी असल्याचे तसेच त्यांच्यात न्युनगंडाची भावना अधिक असल्याचे दिसून येते.

१५) आदिवासी आश्रम शाळेतील अनेक गैरव्यवहार, आहार योजनेतील घोळ, शैक्षणिक साहित्यांचा अभाव, निवासी व वस्तीशाळाचा अभाव, माहिला शिक्षिकांचा अभाव, शौचालय सोयीचा अभाव, कठीण अभ्यासक्रम यासारख्या ठळक कारणामुळे मुलीचे शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.

**५४) दळवे, दशरथ (२०१५) :**

प्रस्तुत लघुशोध प्रबंधात संशोधकांने हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी महिला आणि बंजारा महिलांच्या दारिद्र्यांचा अभ्यास केला असून काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे.

१) आदिवासी स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण ६८ टक्के एवढे आहे.

२) आदिवासी महिला मधील प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण ५४ टक्के आहे.

३) जिल्ह्यातील आदिवासी सामाजातील अर्धवट शिक्षण सोडाव्या लागणाऱ्या महिलांचे प्रमाण हे ४८ टक्के आहे.

४) आदिवासी समाजातील कुटुंबांचा शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण हे १६ हजार ते २० हजार रूपये खर्च होणाऱ्याचे प्रमाण २६ टक्के आहे.

५) आदिवासी समाजातील महिला कुटुंबाकडे शेतजमीन असणाऱ्याचे प्रमाण ७० टक्के आहे.

६) शेतीतून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नात २१ हजार ते ४० हजार वार्षिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ३४.२९ टक्के एवढे आहे.

७) आदिवासी महिलांमध्ये कर्जे घेण्याचे प्रमाण ३८ टक्के आहे.

८) नमुना महिला आदिवासी कुटुंबापैकी ९० टक्के आदिवासी महिला कुटुंबाकडे विजेचा पुरवठा आहे.

९) ४२ टक्के आदिवासी महिला कुटुंबांची वार्षिक १००० ते ५००० रूपये आरोग्यावर खर्च केल्याचे आढळून आले.

१०) नमुना उत्तरदात्या महिलापैकी ५६ टक्के आदिवासी महिला कुटुंबाकडे शौचालयाची व्यवस्था आहे.

११) नमुना उत्तरदात्या महिलापैकी ८४ टक्के आदिवासी महिला कुटुंबांना स्वच्छ पिण्याचा पाण्याची व्यवस्था आहे.

१२) ४४ टक्के आदिवासी महिला कुटुंबाना शासकीय योजनांचा लाभ झाला आहे.

१३) नमुना उत्तरदात्यापैकी ३१.८२ टक्के आदिवासी महिलांनी शासकीय योजनांच्या लाभामुळे आर्थिक परिस्थितीमध्ये सुधाराणा झाल्याचे सांगितले.

१४) ४४ टक्के आदिवासी महिला कुटुंबाना शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याचे दिसून आले.

### ५५) Jayakumar, A. and Polaniyamayal (2016) :

प्रस्तुत लेखात संशोधकानी तामीळनाडू राज्यामधील सालेम जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांचा सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या अभ्यासातील काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी एक एकर पर्यंत जमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची टक्केवारी ३० टक्के, दोन एकर ते तीन एकर जमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ५३ टक्के, तीन एकर ते चार एकर जमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी १० टक्के, आणि चार एकरपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची टक्केवारी ७ टक्के एवढी आहे.

२) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी ९० टक्के आदिवासी कुटुंबानी बॅकाकडून कर्ज घेतलेले असून १० टक्के लोकांनी बॅकाकडून कर्जे घेतले नाही.

३) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी पाच हजार रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाची संख्या ३० टक्के, पाच हजार ते दहा हजार रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या आदिवसी कुटुंबांची संख्या २३ टक्के, १० हजार ते १५ हजार मासिक उत्पन्न असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २१ टक्के आणि १५ हजार पेक्षा आधिक मासिक उत्पन असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६ टक्के एवढी आहे.

४) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी ८३ टक्के आदिवासी कुटुंब हे शेती व्यवसाय, ३ टक्के आदिवासी कुटुंब हे रोजगार, १० टक्के आदिवासी कुटुंब हे मजूरी, आणि अन्य २ टक्के आदिवासी कुटुंब हे इतर व्यवसाय करतात.

५) एकूण नमुना आदिवासी कुटुंबापैकी ४२ टक्के कुटुंब प्रमुख हे निरक्षर आहे.

६) एकूण नमुना आदिवासी कुटुंबांपैकी ९० टक्के कुटुंबांनी कर्जे घेतलेले आहे.

**५६) मावची, सी.एन (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे राजकीय नेतृत्वांचा अभ्यास केलेला असून अभ्यासातील महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) भारतीय संविधानात आदिवासी समुदयातील राजकीय नेतृत्व विकासाची संधी दिसून येते. त्या माध्यामातून राजकीय नेतृत्वात सहभाग वाढलेला आहे असे दिसून येते.

२) नंदुरबार जिल्ह्यात अधिकतम कालखंडात कॉग्रेस पक्षाचा प्रभाव दिसून येतो. नंतरच्या काळात इतर राजकीय पक्षाचा प्रभाव वाढतांना दिसून येतो.

३) नंदुरबार जिल्ह्यामध्ये आदिवासींच्या राजकीय नेतृत्वात घराणेशाही दिसून येते.

४) केंद्र व राज्य स्तरावरील सभागृहामध्ये राजकीय नेतृत्वात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी महिलांचा सहभाग नव्हता, परंतु २०१४ च्या सार्वजनिक निवडणूकीत प्रथमच महिला खासदार कु. हिना विजयकुमार गावीत ह्या निवडून आल्या.

**५७)जाधव, एस.व्ही., पाटील आणि पटेल (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी रावेर तालुक्यातील माध्यामिक शाळेतील आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्याच्या मानसिक स्वास्थाचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. अभ्यासातील काही निष्कर्ष निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) माध्यमिक शाळेतील आदिवासी मुला-मुलींच्या मानसिक स्वास्थात सार्थ फरक आढळून आला नाही.

२) माध्यमिक शाळेतील बिगर आदिवासी मुला-मुलींच्या मानसिक स्वास्थात सार्थ फरक आढळून आला नाही.

३) माध्यमिक शाळेतील बिगर आदिवासी मुलांचे मानसिक स्वास्थ आदिवासी मुलापेक्षा चांगले आहे.

४) माध्यामिक शाळेतील बिगर आदिवासी मुलींचे मानसिक स्वास्थ आदिवासी मुलीपेक्षा चांगले आहे.

**५८) जाधव, बाबुराव (२०१७):**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी पर्यावरणीय ऱ्हासामुळे आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास केलेला आहे. काही निष्कर्ष पुढील प्रमाणे.

१) पर्यावरणांच्या ऱ्हासामुळे आदिवासी स्त्रीयावर पुरुषांच्या तुलनेत अधिक जास्त वाईट परिणाम पडत आहे.

२) जंगलतोड आणि वनाचा होत असलेला ऱ्हास यातून वन संसाधानाची दुर्मिळता निर्माण झालेली दिसून येते. या दुमिळतेमुळे आदिवासी समाजाचे छोटे -छोटे उद्योग बंद पडत आहे.

३) वाढत्या पर्यावरणीय ऱ्हासामुळे आदिवासी महिलांनी सुरु केलेल्या बचत गटासमोर फार मोठे आव्हान निर्माण झालेले दिसून येते.

४) अनेक आदिवासी महिलांनी निर्माण झालेल्या दुष्काळ परिस्थितीमध्ये ३०,००० रुपयाला विकत घेतलेल्या म्हशीना २०,००० रुपयाना विकले. तर ५,००० रुपयाला विकत घेतलेल्या शेळ्याला ३,००० रुपयांना विकावे लागले.

५) बचत गटाच्या माध्यमातून कर्जे घेऊन शेती व्यवसायात गुंतवणूक करणाऱ्या महिला गटांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

६) आदिवासी समाजातील अनेक महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून कर्जे घेऊन वनसंपतीवर आधारित अनेक छोटे मोठे व्यवसाय सुरु केले होते. परंतु साधनाच्या निर्माण झालेल्या दुमिळतेमुळे त्यांना ते व्यवसायस बंद करावे लागत आहे.

७) पर्यावरणीय ऱ्हासाचे विपरीत परिणाम हे फक्त आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक जीवनावर बरोबरच त्यांचे वाईट परिणाम आदिवासी स्त्रीयांचा कौंटुबिक आणि वैयक्तिक जीवनावरही पडत असल्याचे दिसून आलेले आहे.

**५९) ढोले, शेकोबा (२०१७):**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी नांदेड जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापनाचे समाजशास्त्रीय अभ्यास केलेला असून काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी.असून त्यापैकी ५०,७५७ चौ. कि.मी.क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. राज्याच्या एकूण क्षेत्रांशी हे प्रमाण १६.५ टक्के एवढे आहे.

२) २०११च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्या १२१,०५,६९ लक्ष एवढी आहे. त्यापैकी आदिवासी लोकसंख्या १०४२८९ लक्ष असून तीचे प्रमाण ८.६१ टक्के होते.

३) महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११२३,७४ लक्ष आहे. त्यापैकी आदिवासी लोकसंख्या १०५,१० लक्ष असून तिचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ९.३५ टक्के आहे.

४) देशात आदिम जमातीची एकूण संख्या ७५ इतकी असून महाराष्ट्र राज्यात कोलाम, माडिया गोंड, कातकरी या तीन जमातीपैकी कोलाम ही आदिवासी जमात अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे.

५) २०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण साक्षरता प्रमाण ७३ टक्के प्रतिशत आहे. आदिवासी साक्षरता प्रमाण ३१ टक्के असून एकूण साक्षरता प्रमाणांशी १४ टक्के कमी आहे. तर महाराष्ट्रातील एकूण साक्षरता प्रमाण ८२.३ टक्के असून आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ६५.७ टक्के आहे. ते एकूण साक्षरता प्रमाणांशी १६.६ टक्केने कमी आहे.

**६०) कुंभार, समाधान (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी जळगावातील आदिवासी वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची शासकीय शैक्षणिक, योजनाविषयक जाणिव जागृतीचा अभ्यास केलेला आहे. अभ्यासातील काही महत्वपूर्ण निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) 'निवासी शाळा' या योजनेचा लाभ घेणाऱ्याचे प्रमाण १० टक्के एवढे आहे. व लाभ न घेणाऱ्यांचे प्रमाण ९० टक्के एवढे आहे. म्हणजेच सदर शैक्षणिक योजनेचा लाभ हा अनुसूचित जमातींच्या मुलांशी कमी प्रमाणात घेतला आहे, किंवा मिळालेला आहे.

२) आदिवासी मुलामुली करिता 'शासकीय वस्तीगृहे' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमााण ७० टक्के एवढे आहे.

३) आदिवासी विद्यार्थ्यांना  शालांन्त परीक्षेत्तर शिष्यवृत्ती योजना' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण ९० टक्के एवढे आहे व लाभ न घेणाऱ्याचे प्रमाण १० टक्के एवढे आहे.

४) 'अनुसूचित जमातीच्या  विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कांची प्रतिपुती करणे योजना' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण ६० टक्के एवढे आहे.

५) व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण ८५ टक्के एवढे आहे व लाभ न घेणाऱ्यांचे प्रमाण १५ टक्के एवढे आहे.

६) 'राज्यातील विद्यार्थ्यासाठी आपघात विमा योजना' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण  १० टक्के एवढे आहे. व लाभ न घेणाऱ्यांचे न प्रमाण ९० टक्के एवढे आहे.

७) 'आदिवासी विद्यार्थ्याचा आकास्मिक मृत्यू झाल्यानंतर सानुगृह अनुदान योजना' या योजनेचा त्यांच्या कुटुंबात लाभ घेणाऱ्याचे प्रमाण ०५ टक्के एवढे आहे व कुटुंबात लाभ न घेणाऱ्यांचे प्रमाण ९५ टक्के एवढे आहे.

८) 'व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण ३० टक्के एवढे आहे. व लाभ न घेणाऱ्याचे प्रमााण ७६ टक्के एवढे आहे.

९) 'सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजना' या योजनेचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण २० टक्के एवढे आहे. व लाभ न घेणाऱ्यांचे प्रमाण ८० टक्के एवढे आहे.

**६१) काळे, अनंदा आणि भगत, महेंद्र (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी आंध या आदिवासी जमाती विषयी खालील निष्कर्ष काढले आहे.

१) आदिवासी जमातीतील ४७ जमातीपैकी आंध या जमातीचे वास्तव्य प्रामुख्याने विदर्भातच आढळते.

२) निरक्षरता व अंधश्रध्दा इत्यादीचे प्रमाण या जमातीत मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

३) ही जमात कृषि प्रधान असून कोरडवाहू शेती पारंपरिक पध्दतीने करते.

४) शेळी पालन, कुक्कुटपालन तसेच बिब्यांपासून गोडंबी काढणे, विडीव्यवसाय आणि मोहांची फुले गोळा करणे इत्यादी जोड व्यवसाय या जमातीत आढळून येतात.

५) शासकीय योजनांचा फायदा मोठ्या प्रमाणात झालेला नाही.

६) शासकीय नोकरीमध्ये या जमातीचे प्रमाण अत्यल्प आहे.

७) बालविवाह, मूर्तीपूजा, तसेच पारंपरिक सण-उत्सव इत्यादी प्रथा या जमातीत आढळतात.

८) रोजगार प्राप्तीसाठी या जमातीने मोठ्या प्रमाणांत शहरी भागाकडे स्थलांतर केले आहे.

९) आरोग्य संदर्भात कुपोषण, मद्यपान, बालमृत्यू इत्यादीचे प्रमाण या जमातीत आहे.

१०) जमातीमध्ये दरडोई उत्पन्न व वार्षिक उत्पन्नांचे प्रमाण अत्यल्प आहे.

११) जनजागृतीचा अभाव आणि निरक्षरतेमुळे शासकीय योजनांचा पूर्णपणे फायदा झालेला नाही.

**६२) गावंडे, अमरिष (२०१७):**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी आदिवासींच्या आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन केले आहे. त्यानुसार

१) आजच्या आधुनिक काळात समाजातील बहुतांश लोक समृध्द जीवन जगत असताना आदिवासी मात्र हालाखीचे जीवन जगत आहे.

२) आजही बहुतांशी आदिवासी आहारांच्या समस्यांनी ग्रस्त आहे. बहुतांश आदिवासींना आवश्यकते पुरतेचेच कॅलरी युक्त आहारांची उपलब्धता होत नाही.

३) आदिवासींच्या राहणीमानामध्ये आजही स्वच्छतेच्या अभाव दिसून येत असून त्यांचा परिणाम आदिवासी लोक अनेक आरोग्य विषयक समस्यांनी ग्रस्त आहे.

४) आदिवासी समुदायामध्ये आजही अंधश्रध्दा आणि आनिष्ट प्रथाचा प्रभाव मोठ्या प्रमाणांत दिसून येतो.

५) आदिवासी संदर्भात शासनांचा उदासीन दृष्टीकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांचा परिणाम आदिवासी भागात आरोग्य सुविधांचा अभाव दिसून येतो.

६)	बहुतांश आदिवासी आजही आर्थिक समस्यांशी ग्रस्त आहेत. स्थालांतरीत शेती, आणि स्थलांतरित शेतीवरील निबंध यामुळे आदिवासींच्या आर्थिक समस्यामुळे वाढ झालेली दिसून येते.

७)	व्यसनाधिनता आदिवासींच्या बहुतांश आर्थिक समस्यांचे कारण असून त्यांचा परिणाम आरोग्याबरोबरच आर्थिक स्थितीवर झालेला दिसून येतो.

८) कर्जबाजारीपणा आणि वेठबिगारी पध्दतीमुळे आदिवासींच्या समस्यामध्ये झपाट्याने वाढ झालेली दिसून येते.

**६३) शिंदे, नवनाथ (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकलेला आहे.

१)	आजही आदिवासींना आपल्या अन्न, वस्त्र,आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

२)	आदिवासी  हे गरिबी व दारिद्र्यात अडकले आहेत.

३)	पारंपरिक व्यवसाय करतांना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

४)	आदिवासींना अत्यंत अल्प मोबदल्यामध्ये त्यांना वेगवेगळ्या कामासाठी राबवल्या जाते.

५)	आजही आदिवासीमध्ये बालविवाह होत असल्यामुळे अल्पवयात मातृत्व, बालमाता मृत्यूचे प्रमाण वाढत आहे.

६)	आरोग्य विषयक जाणिव नसल्यामुळे विविध आजार, कुपोषण, इत्यादीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्यांचे आढळून येते.

७)	आदिवासी अत्यंत दुर्गम भागात राहत असल्यामुळे आधुनिक पध्दतीच्या आरोग्य सुविधा त्यांचा पर्यत पोहचत नाही.

८) आदिवासींना शहरात आणि इतर ठिकाणी पोहोचण्यासाठी पक्के रस्ते उपलब्ध नाहीत.

**६४) बुटले, राम. (२०१७) :**

प्रस्तुत लेखात संशोधकांनी यवतमाळ जिल्ह्यातील तीन तालुक्यातील 'कोलाम' जमातीचा अभ्यास केलेला असून काही महत्वांची निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

१) भारतीय राज्यघटनेने आदिवासी समुदायाच्या कल्याणाकरिता अनेक तरतुदी केल्या आहेत. त्याद्वारे शिक्षण, आरोग्य, मातृत्व, बालपण, भेदभावापासून मुक्ती सामाजिक व आर्थिक संरक्षण तसेच किमान जीवनमानांचा मानवाधिकार प्राप्त करुन देण्यांची हमी दिली आहे.

२) शिक्षण क्षेत्रात कोलाम जमातीचा अजुनही पुरेशा विकास झालेला नाही. त्यामुळे नोकरी व विकासाच्या इतर संधीच्या दृष्टीने हा समाज मागे आहे.

३) आरोग्यांची संपूर्ण जबाबदारी राज्यव्यवस्थेने स्विकारले आहे. फक्त ५ टक्के लोक शासन सुविधेचा लाभ घेत असून उर्वरित लोक खाजगी डॉक्टर किंवा स्थानिक सुविधा वापरतात. त्यामुळे ते मृत्यूचा शिकार होतात.

४) माता व बालकांच्या आरोग्य रक्षणांची शासकीय जबाबादारी असतांनाही कुपोषण बालमृत्यू त्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

५) कोलाम समाजाला आधुनिक शेती, उद्योग, व्यवसाय व नोकरीच्या संदर्भात फारशा संधी उपलब्ध करुन न दिल्याने दारिद्र्य, कर्जबाजारीपणा इत्यादीमुळे हा समाज आर्थिक संरक्षणापासून कोसो दूर आहे.

६) मानवी हक्कांच्या दृष्टीने जातीयता, आर्थिक,मानसिक व शारीरिक शोषण त्याचप्रमाणे बालमजूरी, कुपोषण या सारख्या गंभीर समस्यांना कायमचे दूर करुन कोलाम जमातीना किमान जीवनमानाचे संरक्षण मानवी हक्क मिळवून देणे ही समाज व शासनांची नैतिक व घटनात्मक जबाबदारी आहे. परंतु सविधानांचा अंमल सुरु होऊन ६५ वर्ष झाली असली तरी आपल्या व्यवस्थेला कोलाम जमातीला मोठ्या प्रमाणात मानवी न्याय देता आला नाही.

**संदर्भ ग्रंथ :**


१) Ressel R.V. and Hiralal, (1975) : 'Tribal and Castes of the centes of the center provicnes of Indian', vol. I, II, III Cosmo Publication, New Delhi, p.n. 38-39

२) Report of the depressed classes and Abori glanal and Hill, Tribal inquiary committee (State Committee) Bombay state, 1929.

३) सावे, खंडेराव, (१९७५) 'वारली', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. १५८ ते १७६

४) सोनम, सुषमा व इतर (१९८६) : 'सिमिटन अहवाल १९३८, शिफारशी व निष्कर्ष', आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी, संशोधन आणि प्रशिक्षिण संस्था, पुणे, पृ. २७

५) नाडगोंडे, गुरूनाथ (१९७०) : 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. १२

६) नेहरू, जवाहरलाल (१९८९), आदिवासी कल्याण, परिषद दस्ताऐवज, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, पृ. ४२

७) Kulkarni M.G., (1968), Problem of Tribal Development, A case study Harsul Black Nashik District, Maharashtra, Gokhale Institue, Mineograph sevies, no. 3, pune.

८) Saxena S. R. (1964) : 'Tribal Economy in India', Firmas K.L., Mukhopadhya Y. Culcutt, p. 45

९) दुबे, बी.के. (१९६७) "ए. स्टडी द ऑफ द ट्राइबल पीपल्स एण्ड ट्रायबल एरियाज ऑफ मध्यप्रदेश", ट्रायबल डेव्हलप एण्ड रिसर्च इंस्टीट्यूट, भोपाल मध्यप्रदेश, पृ.

१०) Siraskar R.P. (1969) 'Problems of Tribal in Maharashtra' seminars on Tribal situation in the Indian institute of advanced study Simla, p. 87

११) मिश्र, विनोद कुमार (१९७३), 'आदिवासी ऋणग्रस्तता, समस्या एवं समाधान', वन्यजाती, वर्ष २१, संख्या १, पृ. १४-२१

१२) वन्यजाती संपादक, आदिवासी ऋणग्रस्तता और उन्मुक्ति, वन्यजाती, वर्ष २१, संख्या २, एप्रिल १९७३, पृ. १

१३) Pani P.P. (1976) : Environmental contests, carpm mix and adoption of new technology tribal and nontribal forms in Madhya pradesh, Agricultural sitation in Indian

१४) भौमिक, पी.के. (१९७६): 'अप्रोच टू ट्रायबल डेव्हलपमेंट', इन्टर इंडिया पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

१५) Yadhv, H and Mishra C.S. (1981) : 'Impact of he tribal development programme of Employment income and Asct Formeation on in baster, district of Madhya Pradesh' Indian, Journal Agricultual Economic Vol, XXXI No., p. 18-21

१६) Sangle, G.K. and Kulkarni, R.R. (1981) : 'Multivater Analysis of Technological Gap in Tribal Farming', Tribal Research Bulletin Vol III.

१७) घोडे, मंगल (१९८७) : 'एकात्मिक ग्रामीण विकास योजनेतर्गत दिलेल्या लाभाचे मूल्यमापन', आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, पृ. १५ ते १९

१८) लालफाक, झुआलांनी (१९९०) : 'महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना' लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ. १७-२०

१९) चौधरी, उद्धव (१९९०) : 'महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक व आर्थिक जीवन' आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्च, पृ. ५९

२०) आसवाले, एम.जी. (१९९१) : 'आंबेगाव तालुक्यातील पश्चिम घाटावरील आदिवासींचे जीवन',

२१) सिंग, के.एस. (१९९२): 'पीपल आफ इंडिया', सिरीज १००१, द शेड्युल्ड ट्राइब्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस बॉम्बे, पृ. ६२-६३

२२) मेहता, प्रकाश, (१९९३) : 'भारत के आदिवासी', शिवा प्रकाशन, उदयपूर, पृ.

२३) मांडे प्रभाकर (१९९४) : 'लोकरंगभूमी, (परंपरा स्वरूप आणि भवितव्य)', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ६२-६४

२४) वर्मा, एम.एल. (१९९५) : 'भीलों का सामाजिक व्यवस्था', क्लासिककल पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली, पृ. २५-२९

२५) कुलकर्णी, अ.द. (१९९५) : ''आदिवासी शेतकऱ्यांना विजपंप पुरवठा काही निरीक्षणे', आदिवासी विभाग वित्त मंत्रालय, मुंबई, पृ.

२६) तेंडुलकर, विभावती आणि पाटील, अनिल ना. (१९९७) : '२१ व्या शतकाच्या उंबरवठ्यावरील आदिवासींचे आरोग्य', योजना मासिक, पृ.

२७) सहाय्यक, बी.एस. (१९९७) : 'आदिवासी कल्याणाचा मार्ग', योजना मासिक,

२८) युनिव्हर्सल बेंचमार्क स्टडी (१९९७-९८), आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महराष्ट्र राज्य पुणे, १, पृ. २५-२९

२९) पाटील, अशोक डी. (१९९८) : 'भील जनजाती और संस्कृती', मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाळ.

३०) Jain Navinchandra (1998) : Tribal in Maharashtra state', in Vidut Joshi (ed), Tribal situation in India, Insuer in Development, Rawat Publication, Jaipur, p. 100

३१) बेडसे, मनिषा साहेबराव (२००२) : 'नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी मुलींच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास आणि उपाययोजना', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

३२) भट्ट, आशीष (२००२) : 'लोकतांत्रिक विकेन्द्रीकरण एवं जनजातीय नेतृत्व', रावत पब्लिकेशन्स, जयपूर.

३३) गुप्ता, मंजु (२००३) : 'जनजातियों का सामाजिक, आर्थिक उत्थान', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली.

३४) त्रिपाठी, एस.एम. (२००५) : ''साामाजिक संरचना विविध चरण', दीपक परमानी जयपूर प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ. ४१९

३५) मुनगेकर, भालचंद्र (२००६) : 'आर्थिक विकास व सामाजिक न्याय', लोकराज्य, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ. ४०-४१

३६) तेगमपुरे, मारोती (२००६) : 'नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाला शासकीय उपाययोजनाच्या झालेल्या लाभाचे अध्ययन',

अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

३७) कोकाटे, नामदेव चंद्रकांत (२००८) : 'हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे सामाजिक व आर्थिक अध्ययन', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

३८) इंगळे, जयवंत शंकरराव (२०१०) : ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतीविषयक अभ्यास, अर्थसंवाद, पृ.२५

३९) सुर्यवंशी, रमेश (२०१०) : आदिवासी ठाकर समाजशास्त्रीय अभ्यास, प्रकाशक मीना सुर्यवंशी, सिद्धार्थ कॉलनी, कन्नड, जि. औरंगाबाद, पृ. ८८-९०

४०) राजपूत, उदयसिंह (२०१०) : 'आदिवासी विकास एवं गैरसरकारी संगठन', रावत पब्लिकेशन, जयपूर, पृ. २५-३०

४१) Arulselram K and R. Macheswari, (2011) : Demographic profile and living conditions of tribale population : A case study, Southern Economicst Delhi Vol. 49, No.18, p. 5,6,7

४२) चव्हाण, सीमा रविंद्र (२०११) : 'शासकीय योजनांचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

४३) वर्मा, गीता आणि गोंड, रविकुमार (संपा.) (२०१२) : 'वर्तमान समय में आदिवासी समाज', वाङ्मय प्रकाशन, अलीगढ प्रथमावृत्ती.

४४) भागडे पोपट मच्छिंद्र (२०१२) : 'ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

४५) डोईफोडे, रामेश्वर श्रीराम (२०१२) : 'आदिवासी कोलाम जमातीच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन व भाषिक अभ्यास', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

४६) Rajkumar, P. Pullrao, D. and Jayanand Kumar, P. (2013) : Analysis of Socio Economic Status of Schedule Tribes In Andhra Pradesh, International Journal of Dvelopment Research, Vol. 3, Issue, 11, P.136-140.

४७) Shankar R, Manimaran S. (2013) : Socio Economic Conditions of Pachamalai tribes, International multidisciplinary Journal, Vol. 1, Issue 1 July, p. 112-118.

४८) Kispatta, Seraphinus (2014) : A Socio-Economic mererable condition of the Tribals in Chhatisgardh (A Caste Study of Dhanwar, Surguja District (G), IOSR Journal of Humanities and Social Science, Vol. 19, ISSU, June 6, p. 26-29.

४९) करंडे संदीपान भागवत (२०१४) : 'ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५०) Kumar, Selva D. and Kumar, Siva (2014) : 'A Study of Current socio Economic conditions of the tribal communities in Nilgiris, Dist. Tamilnadu', Asian Journal of Business and Managment, Vol. 02- Issue 06, p. 582-587.

५१) बोराळीकर, प्रमोद बालाजीराव (२०१५) : 'उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५२) सूर्यवंशी, शिवानंद (२०१५) : 'नांदेड जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांचा अभ्यास', अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५३) गंगणे, वर्षा (२०१५) : 'आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या', ऋचा प्रकाशन, नागपूर.

५४) दळवी, दशरथ (२०१५) : 'मराठवाड्यातील आदिवासी आणि विमुक्त जातीतील महिलांचे दारिद्र्य : एक अभ्यास विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा, अप्रकाशित लघु शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

५५) Jayakumar A. and Palamiyammal, P. (2016) : Socio Economic Status of Scheduled Tribes in Kalrayan Hills, International Journal of Research Granthaalayah, Vol. 4, ISS : 3 : SE, p. 22-30.

५६) मावची, सी.एन (२०१७) : 'नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे राजकीय नेतृत्व' (विशेष संदर्भ लोकसभा व विधानसभा), आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने संपा. महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. क्र. ३०२-३०८.

५७) जाधव, पाटील आणि पटेल (२०१७) : 'माध्यमिक शाळेतील आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा तुलनात्मक अभ्यास', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. ४०५-४१३.

५८) जाधव, बाबूराव (२०१७) : 'पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणामाचा अभ्यास'', आदिवासी

समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. ४१४-४१५.

५९) ढोले, शेकोबा परशुराम (२०१७) : 'आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. ४५८-४६३.

६०) कुंभार, समाधान लोटन (२०१७) : 'आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शैक्षणिक योजनांचे यशापयश', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ.३९-४०.

६१) काळे, आनंदा आणि भगत, महेंद्र (२०१७) : 'आंध आदिवासी जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. ६७-७२.

६२) गांवदे अमरिष (२०१७) : 'आदिवासींच्या आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन', संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन, धुळे, पृ. २५०-२५८.

६३) शिंदे, नागनाथ (२०१७) : 'महाराष्ट्रातील आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ. ५७-५८.

६४) बुटले, राम.एच. (२०१७) : 'मानवाधिकार व भारतीय आदिवासी समुदाय', आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, संपादक महाजन, बडगे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, पृ.६४-६८.